# प्रकरण तीन

## आरोग्य विभाग

**3.538 वॉटर प्युरिफिकेशन खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत आरोग्यविभागाने सन 2014-2015 मध्ये वॉटर प्युफिकेशन खरेदी करण्याकरिता प्रमाणक क्रमांक 1360, दिनांक 31/03/2015 अन्वये रक्कम रुपये 15,94,238/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विभागाने जा.क्र.रजिप/आवि/भा.शा.14/2099/15, दिनांक 20/03/2015 नुसार, मेसर्स महाराष्ट्र स्टेट बेरोजगार स्वयंरोजगार सहकारी संघ मर्यादित, मुंबई यांना कार्यादेश दिल्यानंतर दिनांक 30/3/2015 रोजी करारनामा केलेला आहे, हे नियमबाहय आहे.

2) देयकातून आयकर अधिनियम, 1961 च्या कलम 94 (सी) नुसार 2.30 टक्के टी.डी.एस कपात करणे आवश्यक आहे. रक्कम रुपये 36,667/- कपात न करता देयक प्रदान केले आहे. संबंधीतांकडून सदरची रक्कम वसुल करण्यात यावी.

3) कार्यादेश आदेशातील अट क्रमांक 4 प्रमाणे ई-निविदेत नमूद वर्णनाप्रमाणे पुरवठा केल्यानंतर पुरवठादारास 90 टक्के रक्कम देणे आवश्यक होते. व उर्वरित 10 टक्के रक्कम गुणवत्ता चाचणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रदान करणे आवश्यक होते. असे असतांना पुरवठादारास एक रकमी 100 टक्के रक्कम प्रदान करण्यात आली आहे.

4) शासनमान्य संस्थेकडून गुणवत्ता तपासणी अहवाल घेणे बंधनकारक असतांना तो घेतलेला नाही.

**3.539 लेखनसामग्री साहित्य खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** प्रमाणक क्रमांक 1379, दिनांक 31/03/2015 रक्कम रुपये 42,041/- अन्वये खरेदी केलेल्या साहित्याबाबत खालील आक्षेप उपस्थित करण्यात येत आहेत.

1) लेखन सामग्री साहित्य खरेदी करण्यासाठी दिनांक 31/03/2015 रोजीची टिप्पणी ठेवलेली असून सदर खरेदीसाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची त्याच दिवशी म्हणजेच दिनांक 31/03/2015 रोजी मान्यता घेतलेली आहे.

2) आरोग्य विभागाकडील पत्र क्रमांक सिंजिप/आवि/भांडार/स्टे.ख./4400/15,दिनांक 31/03/2015 अन्वये यश एंटरप्रायजेस, सांगली यांना सदर साहित्य पुरवठा करणेसाठी कळविले आहे. यश एंटरप्रायजेस यांनी टॅक्स ईनव्हाईस नं.1153,दिनांक 31/03/2015 अन्वये वस्तू पुरविलेल्या आहेत. साठा नोंदवही पान नं.11 व 12 वर सदर साहित्य दिनांक 31/03/2015 ला प्राप्त झाल्याची नोंद आहे. यावरुन सदर प्रक्रिया एकाच दिवशी झाल्याची दिसून येते. सदर संपूर्ण प्रक्रिया दिनांक 31/03/2015 ला च पूर्ण होऊन सांगली वरुन सदर साहित्याचा पुरवठा कसा काय करण्यात आला?

3) सदर नस्तीसोबत पुरवठादाराशी खरेदी करणेबाबत दर करार झाल्याचे पत्र नाही किंवा वस्तू निविदा पध्दतीने खरेदी केलेबाबत निविदा उपलब्ध नाही.

**3.540 संगणक खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** प्रमाणक क्रमांक 221, दिनांक 31/03/2015 रुपये 65,658/-. अन्वये जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे कार्यालय व सभापती आरोग्य व शिक्षण जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांचे दालनात प्रत्येकी एक असे दोन एसर कंपनीचे संगणक खरेदी करण्यात आले असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संगणक खरेदी शासन दर करारानुसार के जे एम ग्रुप सिस्टिम सोल्यूशन भाईंदर मुंबई यांचेकडुन करण्यात आलेली आहे. तथापि पुरवठादार हे कंपनीचे अधिकृत डीलर असल्याचे कागदपत्र नस्तीत नाही.

2) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी पुरवठा आदेश दिला ती तारीख व पुरवठादाराने वस्तू पुरविलेल्या इनव्हॉईस यावरील तारीख 31/03/2015 असून कार्यालय व पुरवठा करणारी कंपनी यामधील अंतर याची परिगणना केली असता एक दिवसात साहित्य पुरवठा कसा काय केला ?

3) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संगणकाची संख्या जादा होणार नाही याची दक्षता घेऊन खरेदी करण्यात यावी असे नमुद केले असताना प्रत्यक्षात किती संगणक उपलब्ध आहेत व अजून किती संगणकाची आवश्यकता आहे याबाबत तपशिल न देता व कोणत्याही कार्यासनाची मागणी नसताना संगणक खरेदीचे प्रयोजन काय ?

4) साठा नोंदवही पृष्ठ क्र.11 वर संगणक प्राप्त झाल्याची तसेच ज्या कार्यासनाला संगणक देण्यात आले. त्याची पोहोच नाही तसेच साठा रजिस्टरला संबंधित नोंदीवर सक्षम प्राधिका-याची स्वाक्षरी नाही.

5) संगणकाच्या दर्जाबाबत तांत्रिक अधिकारी अथवा तत्सम अधिका-याचे प्रमाणपत्र नस्तीसोबत उपलब्ध नाही.

**3.541 जिल्हा तांत्रिक सेवा वैद्यकिय अधिकारी वर्ग 3 या संवर्गामधून वैद्यकिय अधिकारी गट ब या संवर्गामध्ये समावेशन केलेल्या वैद्यकिय अधिकारी यांना प्रदान होत असलेल्या वेतनासंदर्भातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** आरोग्य विभागाचे सन 2014-2015 चे लेखापरीक्षणात जिल्हा तांत्रिक सेवा वैद्यकिय अधिकारी वर्ग 3 या संवर्गामधुन वैद्यकिय अधिकारी गट ब या संवर्गामध्ये समावेशन केलेल्या श्रीमती भारती पंडीत चव्हाण वैद्यकिय अधिकारी यांना जादा वेतन व भत्ते रक्कम रुपये 4,22,202/- प्रदान केल्याचे आढळुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन अधिसूचना क्रमांक वेपुर-1209.क्र.प्र/27-सेवा/9, दिनांक 22/04/2009 अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाने शिफारस केलेल्या सुधारीत वेतन संरचना शासनाने लागू केलेल्या आहेत. सदर सुधारीत वेतन संरचना जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांना, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक डीएसआर-2009/प्र.क्र.61/आस्था-02,दिनांक 20/05/2009 अन्वये लागू केल्या आहेत. सदर शासन निर्णयानुसार जिल्हा तांत्रिक सेवा वैदयकीय अधिकारी वर्ग 3 या संवर्गास पीबी 2 रुपये 9,300-34,800 + रुपये 4,400 ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजुर करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासन ,सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक संघट-1093/प्र.क्र.96/ सेवा-6,दिनांक 28/05/2001 अन्वये महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा (गट ब) या संवर्गातील वैद्यकिय अधिकारी आणि जिल्हा परिषदेकडील जिल्हा तांत्रिक सेवा (गट क) आरोग्य या दोन्ही संवर्गातील वैद्यकिय अधिकाऱ्यांना राजपत्रित दर्जा देण्यात आला. तसेच राजपत्रीत दर्जा दिलेल्या सर्व पदांच्या सेवाविषयक बाबी राज्य स्तरावरुन हाताळण्यात येतील आणि सध्याच्या पदधारकांचे समावेशन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सल्ल्याने तसेच विहीत अटी व शर्तीच्या पुर्ततेच्या आधारावर करण्यात यावे असे देखील दिनांक 28/05/2001 च्या शासन निर्णयात नमूद आहे. त्यास अनुसरुन, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक संआसे-2014/प्र.क्र.169/सेवा-1,दिनांक 17/10/2014 नुसार, जिल्हा परिषदेकडील जिल्हा तांत्रिक सेवा वैद्यकिय अधिकारी, वर्ग 3 यांचे, वैद्यकिय अधिकारी गट ब या संवर्गामध्ये समावेशन करण्यात आले आहे. त्यानुसार सुधारीत वेतननिश्चिती करुन वेतन व भत्ते प्रदान करणे आवश्यक होते. तथापि, संबंधित वैद्यकिय अधिकाऱ्यांना 15,600-39,100 ग्रेड पे 5,400 आणि 15,600-39,100 ग्रेड पे 6,600 या वेतन बँड नुसार जादा वेतन प्रदान केले जात आहे. जादा प्रदान वेतन व भत्तेची रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी याबाबत संबंधितांना सूचना देऊन वरील प्रमाणे असणाऱ्या इतर सर्व समान प्रकरणांचा शोध घेऊन त्यांचेकडून अतिप्रदानाची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करुन अनपुालन सादर करावे. याबाबत असेही अभिप्राय देण्यात येत आहेत की, संबंधित विभागाचे प्रमुख म्हणून जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी

शासनाच्या वतीने कामकाज करतांना शासन निर्णयांचे / शासनाच्या ध्येय धोरणाचे पालन होईल याबाबत आवश्यक ती दक्षता घेतलेली दिसून येत नाही.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, 1968 चे नियम 3 चे परिशिष्ट एक मधील नियम क्र.1 (1) चा (क) तसेच परिशिष्ट चार मधील भाग-ब, उपविभाग (1) मधील नियम क्रमांक 18 आणि 19 (3) नुसार, जिल्हा परिषदेचे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या विविध विभागांचे / कार्यालयांचे अंतर्गत लेखापरीक्षण दरवर्षी करुन लेखापरीक्षण अहवाल निर्गमित करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे अंतर्गत लेखापरीक्षणा अभावी प्रभावी वित्तीय नियंत्रण राहू शकत नाही. तसेच नियमितपणे अशी पडताळणी होत नसल्याने, वरील प्रमाणे अतिप्रदानाची प्रकरणे वेळीच उघडकीस येत नाहीत व शासनाचे आर्थिक नुकसान होत असते.

**3.542 जिल्हा परिषद सेस फंडातून पाणी शुध्दीकरण लिक्वीड क्लोरीन खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 20) -** सदर खरेदीवर रक्कम रुपये 4,99,990/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संचालक, वैदयकीय शिक्षण व संशोधन, यांचे पत्र क्रमांक संवैशिवसं/औखक/दर करारास मुदतवाढ/1100/2013,दिनांक 16/05/2013 मध्ये नमुद केल्याप्रमाणे खरेदीबाबत कार्यवाही करण्यात आली नाही. तसेच ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2010/275/ प्र.क्र.172/पंरा-7, दिनांक 19/10/2011 अन्वये रुपये 1,00,000/- च्यावरील खरेदी बाबत ई-टेंडर पध्दतीने खरेदी करणेबाबत सुचनांचे पालन केलेले नाही.

2) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2010/275/प्र.क्र.172/पंरा-7, दिनांक 19/10/2011 मधील परीच्छेद क्रमांक 1 (अ) मध्ये नमुद केल्याप्रमाणे साहित्याचा दर्जा शासनाच्या सक्षम यंत्रणेकडून तपासणीची कार्यवाही न केल्याने शासन नियमांचे उलंघन झालेले आहे.

3) माल वाहतूक पावत्या उपलब्ध नसल्याने दिनांक 28/03/2015 रोजीच माल प्राप्त झाल्याची पडताळणी करता आली नाही.

**3.543 मातृत्व अनुदान योजना अंतर्गत गरोदर मातांना औषधी खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 26) -** सदर योजनेवर रक्कम रुपये 36,29,399/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संचालक, वैदयकीय शिक्षण व संशोधन, यांचे पत्र क्रमांक संवैशिवसं/औखक/दर करारास मुदत वाढ/1100/2013,दिनांक 16/05/2013 मध्ये नमुद केल्याप्रमाणे दरकरारातील खरेदी औषधांचे बीएमसी/ईडआयसी/डिजीडअँन्डडी व इतर संचलनालयाने दरकरार केलेले पुरवठादारांचे दरांशी तुलना करुन न्युनतम बाजारभाव तपासून दरकरारावरील दरापेक्षा कमी दर असल्यास संचालनालयास कळविले नाही. याबाबत ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2010/ 275/प्रं.क्रं.172/पंरा-7,दिनांक 19/10/2011 अन्वये रुपये 1,00,000/- च्यावरील खरेदी बाबत ई-टेंडर पध्दतीने खरेदी करणेबाबत सुचनांचे पालन केलेले नाही.

2) ग्रामविकास विभाग, शासननिर्णय क्रमांक संकिर्ण-2010/275/प्र.क्र.172/पंरा-7,दिनांक 19/10/2011 मधील परीच्छेद क्रमांक 1 (अ) मध्ये नमुद केल्याप्रमाणे शासन दरकरारावरील वस्तु/साहित्य खरेदी करतांना त्याचा दर्जा व प्रत याची शासनाच्या सक्षम यंत्रणेकडुन विहित कार्यपध्दती अनुसरुन तांत्रिक तपासणी न केल्याने शासन नियमांचे उलंघन झालेले आहे.

3) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 02/01/1992 मधील परीच्छेद क्रमांक 8.6 (ड) व उदयोग, उर्जा व कामगार विभाग, परीपत्रक क्रमांक भाखस/काथ्या च्या वस्तु /दर निश्चिती/2012-13/बी-13262,दिनांक 05/09/2012 मधील नियमांचे पालन न करता विभागाने 100 टक्के रक्कम पुरवठादारास प्रदान करुन शासन नियमांचे उलंघन केलेले आहे.

4) माल वाहतूक पावत्या उपलब्ध नसल्याने मुदतीत माल प्राप्त झाल्याची पळताळणी करता आली नाही.

**3.544 माता श्रेणी ¾ च्या मुलांना औषधे व साधन सामुग्री खरेदी बाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 29) -** सदर योजनेवर रक्कम रुपये 13,62,010/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सहसंचालक, आरोग्य सेवा मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 24/07/2013 नुसार निविदा प्रकीयेनुसार द्यावयाचे पुरवठा आदेश निर्गमित होणे अभिप्रेत असल्याने औषधी खरेदी प्रस्ताव दिनांक 30/07/2013 पूर्वी सादर करण्याचे कळविलेले असताना जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद धुळे यांनी पत्र क्रमांक जिप/आरोग्य/औभां/216,दिनांक 28/09/2013 रोजी सादर केल्यामुळे पत्राचे उलंघन झाल्याचे दिसून येते.

2) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2010/275/प्र.क्र.172/पंरा-7,दिनांक 19/10/2011 मधील परीच्छेद क्रमांक 1 (अ) मध्ये नमुद केल्याप्रमाणे शासन दरकरारावरील वस्तु/साहित्य खरेदी करतांना त्याचा दर्जा व प्रत याची शासनाच्या सक्षम यंत्रणेकडुन विहित कार्यपध्दती अनुसरुन तांत्रिक तपासणी न केल्याने शासन नियमांचे उलंघ्घन झालेले आहे.

3) उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 02/01/1992 मधील परीच्छेद क्रमांक 8.6 (ड) व उदयोग, उर्जा व कामगार विभाग परीपत्रक क्रमांक भाखस/काथ्या च्या वस्तु/दर निश्चिती/2012-13/बी-13262, दिनांक 05/09/2012 मधील नियमांचे पालन न करता विभागाने 100 टक्के रक्कम पुरवठादारास प्रदान करुन शासन नियमांचे उलंघ्घन केलेले आहे.

4) माल वाहतूक पावत्या उपलब्ध नसल्याने मुदतीत माल प्राप्त झाल्याची पळताळणी करता आली नाही.

**3.545 मातृत्व अनुदान - औषधे खरेदीतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** मातृत्व अनूदान औषधे खरेदीची रक्कम रुपये 36,91,170/- इतका खर्च केला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मा.संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे सुधारित आदेश-नवसंजीवनी मातृत्व अनुदान-औषध/2011,दिनांक 6/06/2011 अन्वये तज्ञ समितीने सुचविल्याप्रमाणे IFA-100/200 गोळ्या प्रति लाभार्थी व Calcium with vitamin- D3+Magnesium+Zinc-90 गोळया प्रति लाभार्थी या प्रमाणे गर्भवती मातांना निकष प्रमाणे देण्याबाबत नमुद केलेले आहे.

2) सदर प्रत्रात औषधांची मात्रा नमुद असुन-Tab-CalciumCarbonate I.p.1000mg असे स्पष्ट नमुद असुन DMER चे दरकराराचा उल्लेख केला असुन रुपये 282.45/10 x 10 Tablet साठीचे व्हॅटसह दर दिलेले आहेत. असे असतांना Daffodills Pharnca यांना पुरवठा आदेश देऊन त्यांच्याकडून औषधी का मागविण्यात आली याचा खुलासा करावा, कारण उपरोक्त प्रत्राप्रमाणे मे.अजंता फार्मा यांचे कडून मागविणे आवश्यक होते, या बाबत साधार खुलासा करावा.

3) तसेच वरील दोन्ही बिलातील दर रुपये 19.53+5 टक्के व्हॅट या प्रमाणे 1.8 लक्ष गोळयांसाठी रुपये 35,15,400/-तर 5 टक्के व्हॅट ची रक्कम रुपये 1,75,770/- असे एकुण रुपये 36,91,170/- अदा केलेली आहेत, तथापी संचालक, आरोग्य सेवा यांचे दिनांक 6/06/2011 चे पत्रात सदर Tablet च्या दर रुपये 27.97 तर व्हॅटसह रुपये 28.24/- असा नमुद आहे, दरातील तफावतीबाबत खुलासा करावा.

4) उपरोक्त नमुद दोन्ही बिलांसोबत Certificate of Analysis मध्ये Calcium Gluconate i.p-500mg असा उल्लेख आहे. (Gluconate व Carbonate असे दोन वेगवेगळे शब्द वापरण्यात आले आहेत, या बाबत खुलासा करुन खात्री पटवावी) Eslc च्या दरकरारात-Calcium with vitamin D Nfl Tab (Item no-1634) च्या Description मध्ये Calcium phospute 500 Units पर्यंत असे असुन, संचालक-आरोग्य सेवा यांचे संधारीत आदेश दिनांक 6/06/2011 मध्ये मातृत्व अनुदान योजना औषधोपचाराबाबत औषधांच्या दिलेल्या Description नुसार Tab-Calcium Carbounate 1000 mg चा डोस असणे आवश्यक असतांना 500-mg मात्रा असलेले Tablet दिल्याने, गर्भवती महिलांना योग्य प्रमाणात औषधांची मात्रा मिळाली नाही व त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर परिणाम

होण्याची शक्यता नाकारता येत नाही, सबब शासनाने ज्या हेतूने सदर योजना सुरु केली, तीचा मुळ हेतू बाजुला राहिल्याचे दिसुन येते.

5) तसेच Eslc च्या दरकरारात 5 टक्के व्हॅट बाबत नमुद नसतांना 5 टक्के व्हॅट सह रक्कम अदा केली आहे, म्हणुन व्हॅटसाठी अदा केलेली रक्कम रुपये 1,75,770/- संबंधितांकडून वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करणे आवश्यक आहे.

**3.546 प्रलंबित अग्रीमाबाबत.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** अग्रीम नोंदवही नुसार एकुण अग्रिम रक्कम रुपये 6,41,250/- प्रलंबित आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे पत्र क्रमांक लेकअ/1092/ पदु/1489/30,दिनांक 14/03/1994 नुसार वसुली बाबत कार्यवाही करणेत यावी.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परीपत्रक क्रमांक झेडपीए-2009/ प्र.क.522/वित्त-9,दिनांक 10/12/2010 नुसार एकदा अग्रीम दिला असल्यास त्याचे समायोजन झाल्याशिवाय पुन्हा अग्रिम प्रदान करणेत येऊ नये असे स्पष्ट नमुद असतांना पुन्हा अग्रिम प्रदान करणेत आलेले आहे.

3) दिनांक 31/03/2015 अखेर एकूण रुपये 6,41,250/- एवढा अग्रिम वसुल करणेत यावा.

**3.547 सावित्रीबाई फुले कन्याकल्याण पारितोषिक योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** जिल्हा परीषद आरोग्य विभागाने सावित्रीबाई फुले कन्याकल्याण योजने अंतर्गत सन 2014-2015 मध्ये प्रमाणक क्रमांक 72,दिनांक 31/3/2015 रक्कम रूपये 1,20,000/- प्रमाणे खर्च नोंदविलेला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सौ. सुरेखा पोपट भांगरे यांचा जन्म त्यांचे निवडणुक ओळखपत्रानुसार दिनांक 17/7/1995 रोजी झाला असल्याचे आढळुन आले. त्यांच्या पहिल्या मुलीचा जन्म दिनांक 10/3/2011 रोजी झाला आहे. म्हणजेच पहिल्या मुलीच्या जन्माच्या वेळी लाभार्थ्याचे वय 16 वर्ष देखिल नव्हते. मुलीचे वयाचे 18 वर्ष पुर्ण झाल्यानंतरच लग्न करणे या नियमानुसार त्या पेक्षा कमी वयात मुलीचे लग्न करणे कायदयाने गुन्हा आहे. त्यामुळे सदर योजनेचा लाभ उपरोक्त लाभार्थीस दिल्याचे लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

2) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक साफुयो-2004/ 1511/प्र.क्र.297/कु.क.3,दिनांक 24/4/2007 या शासननिर्णयात अर्ज करण्याची पध्दत नमुद केल्याप्रमाणे एक मुलगी असल्यास त्या मुलीचे वय एक वर्ष पुर्ण झाल्यानंतर आणि दोन मुली असल्यास, दुसऱ्या मुलीचे वय एक वर्ष पुर्ण झाल्यानंतर अर्जदारास संबंधित अधिकाऱ्यांकडे अर्ज मिळतील, असे नमुद असतांना लाभार्थीस दुसऱ्या मुलीचे वय एक वर्ष पुर्ण होण्यापुर्वीच अर्ज वाटप करण्यात आलेले आहेत.

शासन निर्णया प्रमाणे अर्ज वाटप करणे आवश्यक असताना, विहीत मुदतीपुर्वीच उपरोक्त लाभार्थ्यांना अर्ज वाटप केल्याचे दिसून येते.

**3.548 ग्रामीण भागातील आर्थिकदृष्टया मागासलेल्या हृदविकार किडणी, कॅन्सर या दुर्धर आजारासाठी जिल्हा परीषद सेस फंडातुन आर्थिक मदत देणेबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** सन 2014-2015 या वर्षाचा आरोग्य विभागाने सदर योजनेवर चार प्रमाणकान्वये एकूण रक्कम रुपये 10,95,000/- खर्च 73 लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी केला आहे**.** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेसाठी एकूण रुपये 10,95,000/- खर्च नोंदविलेला आहे. परंतू खर्चाचे वार्षिक विवरण पहाता या योजनेवर एकूण रक्कम रुपये 9,90,000/- खर्च नोंदविलेला आहे. प्रत्यक्ष केलेला खर्च रूपये 10,95,000/-

वार्षिक विवरणात दर्शविलेला खर्च रूपये 9,90,000/-यामध्ये रक्कम रुपये 1,05,000/- तफावत दिसून येत आहे. 73 रुग्णांपैकी 7 रुग्णांस लाभ दिलेला नाही. असे निदर्शनास येते.

2) 52 रुग्णांस लाभ मिळाला असलेबाबत पोहोच आढळून आलेली नाही. जिल्हा परिषद लेखासंहिता 1968 चे नियम 20 नुसार प्रदान केलेल्या रक्कमेच्या पोहच घेणे असतांना पोहोच घेतलेली नाहीत.

3) अर्जून रंगनाथ डुबे, राहणार कोपरगांव व श्री सुरज रावसाहेब बनकर राहणार राहाता असे आहे. दोन्हीही रुग्ण हे अनुक्रमे कोपरगांव व राहता या शहरी भागातील आहेत. सदर योजना जिल्हा परिषदेने ग्रामीण भागातील रुग्णासाठी सुरू केलेली असून याचा लाभ ग्रामीण भागातील रुग्णासाठी होणे आवश्यक असतानाही हे उदिष्ट सफल झाले नाही.

4) श्री गोरख काशीनाथ घोडेचोर, रा देवसाडे, ता. नेवासा चे प्रकरण तपासात रेशनकार्ड, निवडणुक ओळखपत्र यावर तेलकुडगांव असे आहे. सदर रुग्णाचे गाव देवसाडे की तेलकुडगांव या तफावतीबाबत खुलासा सादर करावा. एकाच लाभार्थ्यास वारंवार लाभ झाला नसल्याची खात्री करता आली नाही. लक्ष्मण रामदास शेलार व किसन रभाजी वेकार्स, वसिमा दादासाहेब शिरसाठ या तीन लाभार्थ्यांचे मंजुर प्रस्ताव तपासणेस मिळालेले नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 10958/ प्र.क्र.73/34,दिनांक 20/11/99 नुसार लाभ देण्यात आलेल्या लाभार्थ्यांचे प्रपत्र अ मध्ये मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. नोदवही परिरक्षित न झाल्याने दुबार लाभ झाला नसल्याचे खात्री करता आली नाही.

**3.549 शारदाग्राम आरोग्य संजीवनी योजने अंतर्गत झालेल्या खर्चाबाबत व त्यातील अनियमिततेबाबत**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** शारदा ग्राम आरोग्य संजिवनी योजनेअंतर्गत झालेल्या विविध योजनासाठी जिल्हा निधीमधुन एकूण खर्च रक्कम रुपये 4,59,98,847/- बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शारदा ग्राम आरोग्य संजिवनी योजने अंतर्गत राबविलेल्या वेगवेगळया 11 योजनांसाठी एकत्रितरित्या तांत्रिक मान्यता ही ग्रामविकास व जलसंधारण विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2012/प्र.क्र.680/वित्त-9,दिनांक 19/03/2012 अन्वये या योजनेचा एकूण खर्च रक्कम रुपये 5,40,00,000/- साठी मा.संचालक, आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य यांची घेणे आवश्यक असताना त्यातुन राबविलेल्या विविध योजनांसाठी योजनानिहाय रुपये 20,00,000/- चे मर्यादेत मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे यांची घेतलेली आहे.

2) (अ) सर्वरोग निदान शिबिरे व शस्त्रक्रिया शिबिरे यासाठी एकूण रक्कम रुपये 12,30,444/- एवढा खर्च करण्यात आला आहे. तथापि, त्यावरील खर्च व नस्ती तपासता रुग्णांची तज्ञ वैदयकिय अधिकारी यांचेव्दारे तपासणी केली आहे. प्रत्यक्ष शस्त्रक्रिया झालेचे अहवाल निदर्शनास आले नाही. सदरची तपासणी ही इतर शिबिरांमध्ये ही करण्यात येते.या योजनेचा मूळ उददेश हा तपासणी व शस्त्रक्रिया असा असतानाही सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रानी फक्त तपासणी बाबतच खर्च केला आहे. तरी योजनेचा मूळ उददेश सफल होणेसाठी व आर्थिक दृष्टया दुर्बल लोकांना जास्तीत जास्त लाभ देणेचे दृष्टीने योजनेची प्रभावी अंमलबजावणी केलेली नाही.

(ब) प्राथमिक आरोग्य केंद्र इंदापूर - रुपये 2,00,000/-, हवेली - रुपये रु.50,000/-, आंबेगांव- 75,000/- अशी रक्कम चष्मे खरेदीसाठी वाटप करणेत आलेली आहे. तथापी याबाबत किती रुग्णांवर मोतीबिंदु अथवा डोळयांची शस्त्रक्रिया करण्यात आली याबाबत अहवाल नस्तीसोबत जोडलेला नाही. तसेच सदरचे अनुदान तीन तालुक्यांनाच का वाटप करण्यात आले. तसेच निवडलेले लाभार्थी हे दारिद्रय रेषेखालील अथवा आर्थिक दृष्टया कमकुवत असलेबाबतचे निकषांची पुर्तता करण्यात आली किंवा कसे यांचा अहवाल उपलब्ध नाही.

(क) याच योजनेतील परिपुर्ण आरोग्य योजने अंतर्गत दुर्गम भागासाठी खाजगी तज्ञ डॉक्टरांकडुन तपासणी करणेसाठी तरतूद रक्कम रुपये 7,89,000/- व खर्च रक्कम रुपये 7,52,895/- इतका करण्यात आलेला आहे. व याद्वारे सुध्दा फक्त रुग्णांची तपासणी करण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे (अ) (ब) (क) प्रमाणे शस्त्रक्रिया न करता सर्व खर्च फक्त तपासणीवरच झालेचे दिसून येते. एकाच प्रकारच्या योजनांसाठी तीन वेळा खर्च पडलेचे दिसून येते.

3) माता बाल सुरक्षित योजनेअंतर्गत रुपये 11,38,800/- खर्च नस्ती तपासता रुग्णास प्राथमिक उपचारानंतर सदरचे प्रकरण गुंतागुंतीचे झालेने खाजगी रुग्णालयात पाठविलेबाबत रेफर लेटर / शिफारस लेटर व प्राथमिक तपासणी अहवाल आदी अभिलेखे नस्तीसोबत उपलबध झाले नाहीत. तथापी सदर गुंतागुतीच्या प्रकरणांची प्राथमिक आरोग्य केंद्रनिहाय संख्या उपलब्ध झालेली नाही. तरी योजनेचा मूळ उददेश सफल होणेसाठी व आर्थीक दृष्टया दुर्बल लोकांना जास्तीत जास्त लाभ देणेचे दृष्टीने योजनेची प्रभावी अंमलबजावणी केलेली नाही.

4) दुर्गम भागासाठी मातृत्व प्रतिक्षालय योजना योजनेअंतर्गत दुर्गम भागासाठी मातृत्व प्रतिक्षालय योजनेअंतर्गत रक्कम रुपये 8,72,134/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. त्यानुसार 1344 लाभार्थ्यांना प्रति माता रक्कम रुपये 1000/- याप्रमाणे 125 प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील 133 दुर्गम गावांमधील उपकेंद्रामध्ये रक्कम अदा करण्यात आलेली आहे. तथापी याबाबत 1344 लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ घेतलेबाबत व गरोदर मातांना वास्तव्य आहार व तीच्यासोबत असलेल्या एका स्त्री नातेवाईकास आहार व बुडीत मजुरी देणे खर्चाबाबत लाभार्थ्यांच्या व तीच्या सोबतच्या नातेवाईकाचा एकत्रित अहवाल नस्तीसोबत जोडलेला नाही.

5) क्लोजर युजर ग्रुप या योजनेतूनच क्लोजर युजर ग्रुप यासाठी सन 2014-15 मध्ये दरमहा रक्कम रुपये 3,76,000/- या प्रमाणे 12 महिन्याची 4000 कार्ड रिचार्ज करणेसाठी रुपये 94 प्रमाणे एकुण रक्कम रुपये 3,76,000/- प्रतीमहा याप्रमाणे 12 महिन्यांचे रक्कम रुपये 45,12,000/- एवढी तरतुद करण्यात आलेली असुन प्रत्यक्ष खर्च रककम रुपये 38,42,000/- एवढा करणेत आलेला आहे.तथापी उपलब्ध अभिलेख तपासणी करता सन 2011-12 मध्ये एकुण कनेक्शन 5282 होते. सन 2013-14 मध्ये एकुण कार्ड कनक्शन 4000 व नविन सिम ॲक्टीवेट 350 व 135 असे आहेत. तसेच 2014-15 मध्येही माहे जानेवारी एकुण सिमकार्ड 4130, माहे फेब्रुवारीत एकुण सिमकार्ड 4085 असे कमी जास्त प्रमाण दिसुन येते. ब-याच ठिकाणी नविन सिमकार्ड ॲक्टीवेट केलेचे दिसुन येते. सदर योजना सन 2011-12 मधील 20/08/2012 मध्ये राबविले असतानाही दरवर्षी नविन सिमकार्ड कसे ॲक्टीवेट केले तसेच त्याबाबत यादी उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे लाभार्थी हे जिल्हा परिषद, पंचायत समिती यांचे सर्व सदस्य व अधिकारी हे आरोग्य विभागाकडील असलेबाबतची खात्री करता आली नाही. दरवर्षी नवीन सीमसाठी केलेली खरेदी मान्य करता येणार नाही.

6) पाहुणी रुग्णालय योजनेअंतर्गत तरतुद रक्कम रुपये 96,82,925/- व प्रत्यक्ष खर्च रुपये 98,99,186/- एवढा करण्यात आलेला असुन रक्कम रुपये 2,16,261/- खर्च तरतुदीपेक्षा जादा करण्यात आलेला आहे. सदर योजनेचा उददेश हा मातांना व बालकांना त्यांचे जन्माचे स्वागत म्हणून एक किट खरेदी करुन दिले जाते. सन 2014-15 मधील अहवाल तपासता मध्ये मातांना 16479 व बालकांसाठी 16479 किट खरेदी करण्यात आले आहेत तथापि सदरचे किटची नोंद ही साठा नोंदवहीत तालुका स्तरावर घेतली जात नाही. तसेच सदरचे किट कसे असावे याबाबत निकषही ठरविण्यात आलेले नाही. तरी प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध असलेल्या औषधां व्यतिरिक्त सदरचे किट असलेबाबत पडताळणी करण्यात यावी.

7) उपरोक्त प्रमाणे शारदा ग्राम आरोग्य संजीवनी कार्यक्रम त्यामध्ये अंतर्भुत असलेल्या विविध योजनांदवारे राबविलेला असुन तो प्रभाविपणे राबविलेबाबत विनियोग दाखला उपयोगिता प्रमाणपत्र, फलनिष्पत्ती अहवाल व ग्रामीण भागात आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील लोकांचा आरोग्य दर्जा वाढलेबाबत व सदर योजना दरवर्षी राबविली जात असुन त्यामध्ये जास्तीत जास्त लाभार्थी सहभागी होत असलेबाबत काय उपाययोजना करण्यात आल्या याबाबत अभिलेखे उपलब्ध झाले नाही.

**3.550 नवसंजिवनी योजनेअंतर्गत अति दुर्गम व आदिवासी भागात वैदयकिय आधिका-यांचे भरारी पथक नेमून त्यांचेव्दारे तातडीची आरोग्य सेवा पुरविणेचे योजनेबाबत झालेली अनियमितता.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** अति दुर्गम व आदिवासी भागात वैदयकिय अधिका-यांचे भरारी पथक नेमून त्यांचेव्दारे तातडीची आरोग्य सेवा पुरविणेचे योजनेबाबत सन 2014-15 मध्ये आंबेगाव रुपये 2,46,000/-, खेड- रुपये 2,46,000/- व मुख्यालय औषधे व इतर रुपये 2,58,000/- असे वाटप अनुदान केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) राज्य कुटुंब कल्याण कार्यक्रम कार्यालय पुणे, महाराष्ट्र राज्य ,यांचे मार्गदर्शक सूचना व अनुदान वितरण आदेश क्रमांक 867/14,दिनांक 21/07/2014 मधील अटी शर्ती नुसार सदरचे अनुदान हे आदिवासी अति दुर्गम व अतिसंवेदनशील भागात जेथे पावसाळयात संपर्क साधता येणे अथवा आरोग्य सेवा पुरविणे अडचणीचे ठरते अशा भागात भरारी पथकाव्दारे 4 मानसेवी वैदयकिय अधिका-यांची नेमणूक करुन व वाहने भाडेतत्वावर घेवून साथरोग व इतर आरोग्य सुविधा पुरवावयाच्या आहेत. तथापि, सन 2014-15 मधील अनुदान हे दिनांक 07/03/2015 रोजी विलंबाने वाटप केलेले आहे. सदरचे अनुदान हे मार्गदर्शक सूचनांनुसार त्वरित पावसाळयातच वाटप करणे आवश्यक असताना व उपरोक्तप्रमाणे साथरोग व आरोग्य सेवेची गरज ही त्याच कालावधीत असल्याने सदर योजनेचा मूळ उददेश साध्य होत नाही कारण शासनाने सदरची योजना ही आदीवासी व दुर्गम भागात साथरोग, कुपोषण व बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी व वेळेवर त्यांचे पर्यंत मदत पोहचावी हा उददेश असताना सदर उददेश सफल झाला नाही.

2) मुख्यालयीन स्तरावरुन अनुदानातुन रक्कम रुपये 2,39,575/- ची औषधे खरेदी करणेत आलेली आहेत.

3) तालुका स्तरावर वाटप केलेल्या अनुदानाबाबत चा विनियोग अहवाल नस्ती सोबत जोडलेला नाही.

4) वाहनांनी दुर्गम भागातच ठरवून दिलेले फिरती क्षेत्रातच प्रवास केलेबाबत लॉगबुकचे छायांकित प्रती उपलब्ध झाल्या नाहीत.

5) उपरोक्त प्रमाणे अटी शर्ती नुसार अट क्रमांक 5 नुसार मानसेवी डॉक्टरांना याबाबत प्रशिक्षण दिलेबाबत व ते मुख्यालयातच राहत असलेबाबत नोंदी उपलब्ध झाल्या नाहीत.

6) तसेच 2 मानसेवी डॉक्टरांची नेमणूक ही आदेश क्रमांक 131/2015,दिनांक 04/03/2015 रोजी वर्षाअखेरीस करण्यात आली आहे व दोन डॉक्टरांना सदरचे कालावधीतच पुर्नर्नियुक्ती देण्यात आली आहे. सबब सदरचे नेमणूका हया पावसाळयातच जून ते ऑगस्टचे दरम्यान करणे आवश्यक होते व जर जाहीर निविदेस प्रतिसाद अल्प प्रमाणात मिळत असेल तर डॉक्टरांना त्वरीत पुर्नर्नियुक्ती देणे अत्यावश्यक असतांना अशी कार्यवाही झालेली नाही.

**3.551 प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी श्वानदंश व सर्पदंश लस खरेदी करणेबाबतचे योजनेचे अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** आरोग्य विभागाकडील श्वानदंश व सर्पदंश लस खरेदीच्या रक्कम रुपये 10,02,773/- या जिल्हानिधीमधील खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ANTY RABIES VACCINE ची 7073 नगांसाठी प्रत्येकी रक्कम रुपये 142.50 दराने पुरवठा करणेसाठी पुरवठा आदेश हा जिल्हा परिषद यांचेकडून INDIAN IMMUNIOLOGICALS यांना देण्यात आलेला आहे. तथापि,नस्तीसोबत जोडलेली बिलाची देयके तपासली असता श्री जी इंटरप्राईजेस यांना रक्कम रुपये 10,02,773/- चे देयक अदा केल्याचे आढळून आले. पुरवठादार व प्रत्यक्ष देयक अदा केलेले पुरवठादार यात तफावत आढळून येते.

2) सदर खर्चासाठी जिल्हा परिषद निधीतुन रक्कम रुपये 20 लाख तरतुद करण्यात आली असूनही तसेच INJ ANTY SNAKE VENIM ची प्रस्तावित वार्षीक मागणी 20930 असूनही खरेदी का करण्यात आली नाही. ग्रामीण व अतिदुर्गम भागात सदरचे आवश्यकता असूनही खरेदी करण्यात आलेली नाही. तसेच सदरचे औषधे ही इतर निधीतून आल्याबाबतची कागदपत्रे नस्ती सोबत उपलब्ध झालेली नाही. तसेच इतर निधीतून प्राप्त झालेली सदरची INJ ANTY SNAKE VENIM या आवश्यक त्या प्रमाणात उपलब्ध झालेबाबत कागदपत्रे नस्ती सोबत उपलब्ध झालेली नाही.

3) जिल्हा निधीमधून जर खरेदी करावयाची नव्हती तर रक्कम 50 टक्के प्रमाणे रुपये 10 लाखाची तरतुद का करण्यात आली?

**3.552 प्राथमिक आरोग्य केंद्र औषधी अनुदानात वाढ योजनेअंतर्गत केलेल्या खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 21) -** आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सातारा यांनी प्रमाणक क्रमांक 230,दिनांक 31/03/2015 रुपये 7,62,000/- अनुसार प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी औषध खरेदीसाठी खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेश दिनांक 31/03/2015 नुसार Tab Paracetamol 500 mg च्या 30,00,000 गोळयांचा पुरवठा करणे आवश्यक होते. तथापि डिलीव्हरी चलने पाहता 23,00,000 गोळया प्राप्त आहेत. तरीही 30,00,000 टॅबलेट्स प्राप्त झाल्याची नोंद साठा नोंदवहीत घेतली आहे. त्यामुळे कमी प्राप्त 7 लक्ष टॅबलेट्स रुपये 0.254 प्रति टॅबलेट्स प्रमाणे रुपये 1,77,800/- जादा आदाई झालेली असून ती वसुल करणे आवश्यक आहे.

**3.553 सर्व रोग निदान शिबीर खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** आरोग्य विभागाने सन 2014-2015 मध्ये सर्व रोगनिदानावर केलेल्या खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रमाणक क्रमांक 54 दिनांक 09/02/2015 नुसार रक्कम रुपये 1,00,000/- तसलमात दिला आहे. तथापि त्याची नोंद नोंदवही व विवरणपत्रामध्ये नाही.

2) तसलमातीचे समायोजन सन 2014-2015 मध्ये झाले नसल्याने थकबाकी मध्ये समावेश असणे आवश्यक असताना तशी नोंद नोंदवहीत व विवरण पत्रात नमूद नाही.

3) प्रशासकीय मान्यता व टिपणी मध्ये तफावत असल्याचे दिसून येते. प्रशसकीय मान्यते मध्ये लेक वाचवा अभियान तर टिपणीमध्ये सर्वरोग निदान शिबीर नमूद आहे.

**3.554 प्राथमिक आरोग्य केंद्रांना वाहन चालक पुरवणे खर्च अनियमितता.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** आरोग्य विभाग प्राथमिक आरोग्य केंद्र वाहनाकरीता कंत्राटी पध्दतीने वाहन चालक पुरवणे करिता माहे जानेवारी 2014 ते जून 2014 या कालावधीत पुरवठा केलेल्या वाहन चालकांच्या मोबदल्याची रक्कम रुपये 17,58,837/- विविध प्रमाणकान्व्ये मक्तेदार युवा स्वयंरोजगार एकात्मिक ग्रामीण विकास सहकारी संस्था मर्यादित, गारगोटी यांना अदा केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) याबाबतची ई निवदा प्रकिया तपासणी केली असता प्राथमिक आरोग्य केंद्रांना वाहनचालक पुरवणे सन 2011-2012 चे मक्तेदार युवा स्वयंरोजगार एकात्मिक ग्रामीण विकास सह.संस्था गारगोटी यांची मुदत दिनांक 17/05/2012 रोजी संपुष्टात आली होती. तथापि याबाबतची "ई" निविदा सूचना क्र.1 दिनांक 31/10/2012 रोजी प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रांना वाहन चालक पुरवणे सन 2012-2013 ई-निविदा प्रसिद्ध करण्यास तब्बल 5.5 महिने इतका विलंब झालेला आहे.

2) महासंचालक आरोग्य सेवा मुंबई यांचे पत्र क्रमांक संआसे/निविसु/कंत्राटीपदे/कक्ष7/05 दिनांक 25/02/2015 प्रमाणे आकृती बंधानुसार आवश्यक असणाऱ्या वाहनचालक यांची कंत्राटी पद्धतीने नेमणूक केल्यास त्यास मूळवेतनापेक्षा जादा रक्कम देऊ नये असे आदेश दिले आहेत. 6 वा वेतन आयोग प्रमाणे वाहनचालकाचे मूळवेतन 5830+1900(GP)=7,730/- इतके आहे. तथापि निविदा प्रसिद्ध करताना आरोग्य महासंचालक यांच्या आदेशा प्रमाणे मूळवेतन पेक्षा जादा निविदा दर भरणा करू नयेत अशी अट समावेश न करता निविदा प्रसिद्ध केल्याने प्रतिमहा प्रति वाहनचालक रक्कम रुपये 9,750/- असे किमान दर प्राप्त झाल्याने आवश्यकतेपेक्षा रक्कम रुपये 9750-7730 = 2,020/- इतके जादाचे दर प्राप्त झाले. सदोष निविदा प्रसिद्धी करून जादाचे दर मंजूर करून रक्कम अदा केल्याने सन 2014-15 मध्ये खालील प्रमाणे याकामी मक्तेदारास रक्कम रुपये 3,67,407/- जादा रक्कम अदा करावी लागली.

3) कंत्राटी कामगार (नियमन व निर्मूलन) अधिनियम 1970 प्रमाणे कामगार पुरवठा करणारी संस्था सदर अधिनियामान्व्ये नोंदणीकृत असणे आवश्यक असून निविदा मागणी करताना फक्त नोंदणीकृत संस्था कडून मागणी करणे आवश्यक होते तथापि अशी कार्यवाही केलेली नाही.

4) कंत्राटी कामगार (नियमन व निर्मूलन) अधिनियमातील तरतुदी प्रमाणे कंत्राटदार संस्थेकडून कामगारांना नियमित व विहित दिनांकास वेतन दिले जात असल्याबाबत जिल्हा परिषद विभागाने खात्री करणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही झाली नाही.

**3.555 सहाव्या वेतन आयोग वेतन जादा अदाई वसुली न झालेबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** पंचायत समिती आजरा आरोग्य विभागाकडील भादवण प्राथमिक आरोग्य केंद्र, भादवण येथील सेवापुस्तके तपासली असता सहाव्या वेतन आयोगानुसार जादा अदा वेतन वसूल न झाल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

श्रीम.सुमन हंबीरराव मोहिते यांच्या सेवापुस्तकात मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे अधिनस्त वेतन पडताळणी पथक यांनी 6 वा वेतन आयोग अतिप्रदान दिनांक 01/04/2009 ते 30/10/2011 अखेर जादा वेतनाची वसुली करणेबाबत आदेशीत केले आहे. त्यानुसार एकूण वसुली रुपये 1,17,414/- इतकी होते पैकी श्रीम.मोहिते यांच्याकडुन दिनांक 15/10/2013 ते 04/01/2015 या कालावधीत फरक रक्कम रुपये 52,000/- वसुली झालेचे दिसुन आली. उर्वरित रुपये 65,414/-ची वसुली सद्यस्थितीत थांबविली आहे. सबब उर्वरीत जादा अदा रक्कम वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**3.556 जिल्हा परिषद सेस मधून 40 वर्ष वयावरील नागरिकांना चष्मा वाटप.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदर योजनेवर रक्कम रुपये 19,99,032/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) चष्मा वाटप योजना ही सन 2014-2015 या आर्थिक वर्षामध्ये राबवणे आवश्यक होते प्रशासकीय मान्यता ही दिनांक 08/08/2014 व तांत्रिक मान्यता दिनांक 31/12/2014 रोजी मिळून सुध्दा पुरवठा आदेश हा 31/03/2014 रोजी विलंबाने देण्यात आलेला आहे त्यामुळे सदर योजनेचा हेतू सफल झालेला नाही.

2) सन 2014-2015 या वर्षासाठी करण्यात आलेली संपूर्ण खर्च रुपये 19,99,032/- हा सन 2015-2016 मध्ये खर्च पडला आहे ही अत्यंत गंभीर अनियमितता आहे. खर्च लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

3) लेडीज फ्रेम व जेन्ट्स फ्रेम या वेगवेगळ्या पुरवण्याबाबत पुरवठा आदेशामध्ये नमूद आहे. परंतु त्या कोणत्या प्रकारच्या मेटल प्लास्टिक कार्बन याचा पुरवठा करायचा आहे याचा उल्लेख नाही.

4) सदरचे चष्मे हे पुढील आर्थिक वर्षामध्ये पुरवठा करण्यात आल्यामुळे ते विहित कालावधीमध्ये नमूद सन्ख्येइतकेच पुरवण्यात आले याची खात्री करता आली नाही.

5) लाभार्थ्यांच्या संख्या कशाच्या आधारे ठरवून 2355 व 8734 इतके चेष्मे खरेदी करण्यात आले. याचा खुलासा होत नाही.

6) सदर योजना राबविताना ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक1068/नक/ 73/34,दिनांक 20/10/1999 तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/वित्त 309,दिनांक 20/06/2008 परिशिष्ट इ नुसार वैयक्तिक लाभार्थी निवड 31 मे अखेर होणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदेने तशी कार्यवाही केलेली नाही परिशिष्ट इ नुसार साहित्याची खरेदी 30 सप्टेंबर अखेर करून साहित्याचे वाटप केले आहे 30 नोव्हेंबर अखेर करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

**3.557 कंत्राटी वाहन चालक पुरवठा ठेक्याबाबत**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदर खर्च शासन निधीमधून एकूण रक्कम रुपये 13,51,669/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वाहन चालक पुरवण्याचा ठेका सन 2013-2014 या कालावधीसाठी मे श्री समर्थ बहु उद्देशीय स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था बठान तालुका मंगळवेढा रुपये 6,150/- प्रती चालक प्रती महिना या प्रमाणे देण्यात आलेला होता. सदर ठेक्याची मुदत दिनांक 31/03/2014 रोजी संपुष्टात आलेली आहे. ठेकेदारास पुढील दिनांक 01/04/2014 ते दिनांक 31/05/2015 या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. मुदतवाढ ही नियमबाह्य असून पूर्वीच्या ठेक्याची मुदत संपण्यापूर्वीच सन 2014-2015 साठी नवीन निविदा प्रक्रिया राबवून ठेका देणे आवश्यक होते. तशी कारवाही केली नाही पूर्वीच्या ठेकेदारास अधिक कालावधीसाठी नियमबाह्य ठेका देण्यात आलेला आहे.

2) निविदेतील अट क्रमांक 2 प्रमाणे निविदा फॉर्म किमत रुपये 5,000/- बयाना रक्कम रुपये 65,000/- या रकमेचा तपशील लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

3) निविदेतील अटीप्रमाणे ठेकेदाराच्या बँक खात्यावर रुपये 2.00 लाख शिल्लक असल्याचा पुरावा जोडलेला नाही.

**3.558 जंगम मालमत्ता नोंद वहीमधील त्रुटीबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जंगम मालमत्ता नोंदवही नमुना क्रमांक 32 ची तपासणी केली असता पान क्रमांक 160 वर microtek 5.6 kva inveter व battery रुपये 11,10,000/- ची खरेदी करण्यात आलेली आहे नोंदवहीमध्ये प्रमाणक क्रमांक व दिनाक नमूद नाही व 6 inverter व 36 बॅट-या कोठे वाटप करण्यात आल्या याचा तपशील उपलब्ध नाही.

2) पृष्ठ क्रमांक 66 वर जनरेटर्सची नोंद असून 7 जनरेटरची त्यांचे वाटप कोणत्या विभागास करण्यात आले केव्हा खरेदी केली यांच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत नोंद वहीमध्ये जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या स्वाक्ष-या नाहीत.

**3.559 दुर्धर आजाराने पीडित रुग्णांना (हृदयरोग,कर्करोग,किडणी) आर्थिक सहाय्य देणेबाबत खर्चातील अनियमितता. (स्वनिधी)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** दुर्धर आजाराने पीडित रुग्णांना आर्थिक सहाय्य देणेबाबतची योजना राबवितांना पुढील अनियमितता आढळून येतात.

1) शासन निर्णय आरोग्य विभाग जिआयो-1087/प्र.247, आरोग्य 3, दिनांक 6 नोव्हेंबर 1997 तसेच शासन निर्णय एमजी 1099/प्रं.238 आरोग्यं 3, दिनांक 21 सप्टेंबर 1999 च्या अनुषंगाने प्राधिकृत केलेल्या रुग्णालयातून लाभार्थीनी उपचार घेतल्या बाबत वैध पुरावे आढळून आलेले नाही.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक एलफसी 2006 /प्र.क्र.4770/वित्त 3, दिनांक 03/11/2006 अन्वये दिनांक 15/12/2014 व दिनांक 18/03/2015 रोजी अनुक्रमे 114 व 36 लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. मात्र याबाबतचे प्रोसेडिंग लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आलेले नाही. तसेच लाभार्थी यादीवर मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या आढळून आल्या नाहीत.

3) लाभार्थी नामे श्रीमती सरस्वती गव्हाळे व सुभाष तायडे रा.कापुसतळणी यांचे मृत्युचे दाखले नसतांना त्यांच्या वारसास लाभ प्रदान करण्यात आलेला आहे त्यामुळे अंतिम लाभार्थी निवडीपुर्वी सदर व्यक्ती मयत झाले अथवा नाही याची पडताळणी करता आली नाही.

4) प्रदिप रामदास सुर्यवंशी या लाभार्थ्याचा अर्ज लाभार्थी निवड यादीनंतरचा असून सूध्दा त्यास रक्कम रुपये 10,000/- चा लाभ दिलेला आहे.

5) विठ्ठल जयरामजी गुर्जर या लाभार्थ्याने दिनांक 21 जानेवारी 2015 रोजी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतंर्गत लाभ घेतलेला आहे. असेही असतांना त्यास रक्कम रुपये 10,000/- मंजुर करण्यात आलेले आहे.

**3.560 जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सन 2014-2015 मध्ये संवेदनशील आदीवासी भागात विशेष आरोग्य सेवा पुरविणे अंतर्गत माता व वर्ष 3 व 4 चे बालकाकरीता औषधी खरेदीतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** आरोग्य विभाग जिल्हा परिषद अमरावती जिल्हा वार्षीक आदीवासी उपयोजना अंतर्गत सन 2014-2015 मध्ये औषधी खरेदी करीता रक्कम रुपये 63,690/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संचालक आरोग्य सेवा यांनी रक्कम रुपये 38,08,569/- च्या औषध यादीस तात्रिक मान्यता आदेश क्रमांक 3090 दिनांक 01/08/2014 नुसार देण्यात आली. त्यानुसार जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दिनांक 18/03/2015 अन्वये वेगवेगळया कंपनीस वेगवेगळया औषधीचा पुरवठा करण्याचे आदेश दिले परंतु मे.झीम लेबॉरेटीज नागपुर वगळता अन्य कुठल्याच कंपनीने औषधीचा पुरवठा केलेला नाही. त्यामुळे पुरवठादारास दंड करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. पुरवठा आदेशात विलंबाने पुरवठा करण्याबाबत दंडाच्या रकमेची शर्त नमुद केली नाही तसेच पुरवठा आदेश प्राप्त झाल्यापासून 7 दिवसाच्या आतमध्ये 5 टक्के सुरक्षा ठेव किंवा बँक गॅरंटी देणे गरजेचे असतांना अशा प्रकारची कार्यवाही केलेली नाही.

2) संचालनालयाने दिनांक 01/08/2014 रोजी दिलेल्या तांत्रिक मान्यता आदेशामध्ये दिलेल्या सुचनेचे पालन करण्यात आले नाही.

3) पुरवठादाराने 1.5% रकमेची Sample Testing फी आणि इतर आकस्मीक खर्च कार्यालयास पाठविले नाही.

4) मुल्यंवर्धीत कराची 2% रक्कम कपात केलेली नाही.

**3.561 वेतनातील कपातीच्या पोचपावत्या लेखापरीक्षणास उपलब्धं न करणेबाबत. (शासकीय निधी)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 19) -** आरोग्य विभाग जिल्हा परिषद अमरावती चे सन 2014-2015 चे लेखापरीक्षणाचे वेळी किरकोळ रोखपुस्तकाची तपासणी केली असता आयकर कपाती, एलआयसी, भविष्य निर्वाह निधी, सीपीएफ, व्यवसाय कर विविध लेखाशिर्ष अंतर्गत रकमा भरणा करण्यात आल्याबाबत माहे डिसेंबर 2014 व मार्च 2015 च्या पोचपावत्या लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्यामुळे योग्य लेखाशिर्षात भरणा केल्याबाबतची खात्री करता आली नाही.

**3.562 सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक योजना अंतर्गत झालेल्या लाभ प्रदानातील अनियमितता. (शासकीय निधी)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 22) -** जिल्हा परिषद आरोग्य विभागास प्रमाणक क्रमांक 282,307 दिनांक 31 मार्च 2015 अन्वये एकुण 20,00,000/- रुपये सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषीक योजनेची रक्कम प्राप्त झाली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थ्यांना वितरण करण्यात आलेल्या राष्ट्रीय बचत प्रमाणपत्राबाबत कोणतीही पोच लेखापरीक्षणास उपलब्ध होवू शकलेली नाही.

2) कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया करणाऱ्या लाभार्थ्यांना त्यांच्या बँक खात्यात देय रकमा जमा करावयाचे आदेश असतांना सदरच्या रकमा रोखीने वाटप करण्यात आलेल्या आहे. शिवाय प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकाऱ्याचे रोख रक्कम देण्याबाबत नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आलेले नाही.

3) महाराष्ट्र शासन सार्वजानिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांक साफुयो 2004/1511/प्र.क्र.297, दिनांक 24/04/2007 मध्ये नमुद मार्गदर्शक सुत्राची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

4) शासन निर्णयातील बाब क्रमांक 12 अन्वये पात्र ठरलेल्या लाभार्थी जोडप्यांचे प्रसिध्दी देवून सत्कार करण्यात आलेले नाही.

**3.563 आयुर्वेदीक व युनानी दवाखान्याच्या सुविधेत वाढ करणे अंतर्गत औषधी खरेदीमध्ये अनियमितता. (शासकीय निधी)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 23) -** आयुर्वेदीक व युनानी दवाखान्याच्या सुविधेत वाढ करण्याच्या दृष्टीने सन 2014-2015 मध्ये एकुण 13,32,160/- रुपयाची औषधे खरेदी केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रशासकीय मंजुरीतील अटी नुसार सक्षम अधिकारी यांच्याकडून निरीक्षण व तपासणी करण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन वैद्यकीय व औषधी द्रव्य विभाग क्रमांक डी.पी.आर 1080/सीआर 230/88/एमइडी 4 ब, दिनांक 31/08/1990 च्या क्रमांक 32 नुसार 20 टक्के रक्कम गुणात्मक तपाणीच्या आधीन राहून राखीव ठेवायचे असतांना कंत्राटदारास मात्र कोणतेही तपासणी न करता पुर्ण प्रदान केलेले आहे.

3) मुल्यवर्धीत कराची रक्कम देयकातून कपात केलेली नाही.

**3.564 जिल्हा परिषदांनी स्व: निधीतून दुर्धर रोगांनी पिडीत असलेल्या रुग्णांना आर्थिक मदत योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** आरोग्य विभाग जिल्हा परिषद अकोला यांनी दुर्धर रोगांनी पिडीत असलेल्या रुग्णांना आर्थिक मदत योजनेअंतर्गत सन 2014-2015 मध्ये रुपये 95,40,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषदेने त्यांच्या कार्यक्षेत्रातील रहिवाशांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्याकरीता व अर्थसहाय्य करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद तरतुदीच्या अनुषंगाने स्वनिधीतून रुपये 95,40,000/- खर्च केला असून शासन निर्णय जी.आयो/1087/प्र.क्र.247/आरोग्य-3, दिनांक 06/11/1997 व शासन निर्णय क्रमांक एम.जी.1099/प्र.क्र.238/ आरोग्य-3, दिनांक 21/08/1999 नुसार विशिष्ट आजारासाठी प्राधिकृत रुग्णालयातून उपचार घेतलेल्या रुग्णंना आर्थिक मदत देता येते परंतू अशा रुग्णालयांमध्ये उपचार न घेताही आर्थिक मदत दिली आहे.

2) ग्रामविकास व जलसंधारण परिपत्रक दिनांक 5/10/1989 च्या निकषानुसार लाभ दिल्याचे आढळत नाही. जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 77(2) नुसार पिडीत लाभार्थ्याच्या पोच पावत्या नस्ती व अर्जासोबत आढळून आल्या नाहीत.

3) दुर्धर रुग्णांच्या अर्जासोबत तज्ञ डॉक्टर किंवा जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे प्रमाणपत्र जोडण्यात आले नाही.

4) लाभार्थी मृत्यु पावल्याने प्रकरण क्रमांक 120 दिनांक 05/07/2014 व्दारे अदा केलेली रक्कम रुपये 1,20,000/- सेस फंडात परत केल्याचे चलान आढळले नाही.

**3.565 सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजनेबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** आरोग्य विभाग जिल्हा परिषद अकोला यांनी सावित्रीबाई फुले कन्या योजनेअंतर्गत सन 2014-15 मध्ये रुपये 3,16,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सावित्रीबाई फुले कन्या पारितोषिक योजनेअंतर्गत शासन निर्णय क्रमांक साफुयो/ 2004/1511/प्र.क्रं.297 कु.क.3 मंत्रालय मुंबई, दिनांक 24/07/2007 नुसार लाभार्थी अर्ज तपासले असता शस्त्रक्रिया केल्यापासून 3 वर्षाचे आत लाभार्थ्याने अर्ज सादर करणे आवश्यक असतांना केवळ योजनेच्या पुर्ततेसाठी अर्ज प्राप्त दर्शवून सदर अर्ज प्रलंबित ठेवले व 3 वर्षावरील अर्जास मंजूरी देण्यात आली.

2) शासन निर्णय क्रमांक साकुया/क/2004/1511/प्रकरण क्रमांक 297, एप्रिल 2006 नुसार लाभार्थ्यांचे अर्ज 6 महिन्यापेक्षा अधिक कालावधीसाठी प्रलंबित ठेवता येणार नाही परंतू सदर अर्ज 6 महिन्यांपेक्षा जास्त काळ प्रलंबित ठेवण्यात आले आहेत.

3) अमरावती जिल्हयातील लाभार्थ्यांच्या अर्जासोबत जिल्हा आरोग्य अधिकारी अमरावती यांचे कडील नादेय प्रमाणपत्राची मुळ प्रत अर्जासोबत जोडण्यात आली नाही.

**3.566 औषधी खरेदी मधील अनियमितता.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** प्राथमिक आरोग्य केंद्राला पुरविण्यासाठी औषधी खरेदी करण्यामधील अनियमितता.

1) पॅरासीटामल खरेदीचा दर करार स्कॉट एडील मुंबई यांचे सोबत करण्यात आला असुन कंपनीने नेमलेल्या स्टॉकीस्ट मध्ये राहूल फार्मा लिमिटेड कंपनी, वडाळा चा समावेश नसतांना बिल क्रमांक 1272 दिनांक 07/01/2013 नुसार पॅरासीटामल 800000/- नग खरेदी केल्याचे आढळून आले.

2) बिल क्रमांक 130 दिनांक 27/11/2015 कोमल हेल्द, मुंबई यांच्याकडून 2700 नग सेफ डिलिव्हरी किटस खरेदी करण्यात आले असुन साठा पुस्तकातील पृष्ठ क्रमांक 132 वर दिनांक 10/12/2014 ते 24/12/2014 पर्यंत 1720 नग किटस चे वाटप केले असुन दिनांक 01/04/2015 ला 980 नग शिल्लक असल्याचे आढळून आले. त्यामुळे मागणी निश्चित न करता खरेदी केल्याचे आढळून येते.

3) Koef Syp 30,000 बॉटलचा पुरवठा आदेश क्रमांक 3003 दिनांक 29/09/2014 देण्यात आला. परंतु प्रत्यक्ष खरेदी 22037 बॉटलची करण्यात आली. म्हणजेच 7963 बॉटल Koef Syp ची खरेदी कमी करण्यात आली व त्यामधून फिनाईल खरेदी करण्यात आली.

4) वैद्यकीय अधिकारी यांचे उपयोगीता प्रमाणपत्र घेण्यात आले नाही.

**3.567 आदिवासी क्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्राचे बळकटीकरणाकरिता साहित्य खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** प्राथमिक आरोग्य केंद्राचे बळकटीकरण योजनेअंतर्गत रक्कम रुपये 10,51,516/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आरोग्य सेवा संचालनालय, यांचे पत्र क्रमांक 109 दिनांक 04/02/2014 अन्वये सदर योजनेतून प्राथमीक आरोग्य केंद्राचे बळकटीकरणा करीता रुपये 80 लाखाची तांत्रिक मान्यता वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये घेतली आहे. परंतू सदर योजनेच्या सन 2013-14 चे अखर्चित निधीमधून सन 2014-2015 मध्ये पोर्टेबल फायर इक्स्टींग्युशर क्लीन गुजन्ट कॅपॅसिटी 4 किलो- 100 नग डिजीएस ॲन्ड डी दरकरारखरेदी करणेबाबत आरोग्य सेवा संचालनालयाकडून नव्याने तांत्रिक मंजूरी घेतली नाही.

2) मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, यवतमाळ यांनी उपरोक्त साहित्य खरेदी करणेकरीता रक्कम रुपये 8,32,100/- ची मंजूरी प्रदान केली असता रक्कम रुपये 10,51,516/- खर्च केला आहे. प्रशासकीय मान्यतेपेक्षा जादा खर्चासही रक्कम रुपये 2,19,416/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

3) डीजीएस ॲन्ड डी दरकरारानुसार पोर्टेबल फायर इक्स्टींग्युशर क्लीन गुजन्ट कॅपसिटी 4 किलोचे प्रती नग दर 8,321/- आहे. परंतू पुरवठादाराचे पोहच पावतीवर दर 9,349.48/- प्रमाणे 100 नग 9,34,948 + 1,16,868 (12.5 टक्के VAT) = 10,51,516 केले आहे. पुरवठा आदेशाप्रमाणे सदर साहित्याचे प्रती नग दर 8,321 प्रमाणे 100 नग (8,32,100 + 1,04,012 (12.5 टक्के VAT) = 9,36,112) असे आवश्यक असतांना पुरवठादाराचे देयकामध्ये रक्कम रुपये 10,51,615/- दर्शविल्यामुळे रक्कम रुपये 1,15,414/- चे जादा शोधन झाले आहे.

4) पुरवठादाराचे इनव्हाईस मध्ये चालान क्रमांक नमुद नाही, तसेच डिलेव्हरी चलान व ट्रान्सपोर्टरचे कंन्साईनमेंट नोट व प्रमाणकासोबत आढळले नाही त्यामुळे साहीत्य भांडार विभागाला प्राप्त झाल्याचे दर्शवावे.

5) साहीत्याचे वाटप प्राथमिक आरोग्य केंद्रांना साठा नोंदवहीतुन केल्याचे आढळले नाही.

**3.568 प्राथमीक आरोग्य केंद्राना भांडार विभागाचे डिलेव्हरी चलान प्रमाणे औषधी वितरीत न करता साठा नोंदवही मधून औषधीची संख्या घटवून संशयीत अपहार करणेबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

जिल्हा परीषद आरोग्य विभागामार्फत दरकरारानुसार विविध योजनेअंतर्गत औषधी खरेदी करुन प्राथमिक आरोग्य केंद्राचे साठा नोंदवही व डिलेव्हरी चलानची तपासणी केली असता जिल्हा आरोग्य केंद्राना वितरीत केली जात नाही. परंतू प्राथमिक आरोग्य केंद्राना वितरीत न केलेली औषधी जिल्हा आरोग्य विभागाचे साठा नोंदवहीमधून घटविल्याचे निर्दशनास येते. सबब वितरीत न केलेल्या औषधीची रक्कम रुपये 86,800/- संबधीतावर जबाबदारी निश्चित करुन वसुल करण्यात यावी.

**3.569 सोलर वॉटर हिटर खरेदी मधील अनियमितता**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) माननिय मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्र क्रमांक 3785 दिनांक 17/02/2014 नुसार साहीत्य पुरविण्याची मुदत 45 दिवस होती.परंतु प्राथमिक आरोग्य केंद्र धामणगांव बढे, प्राथमिक आरोग्य केंद्र अंढेरा यांना माहे जुन 2014 मध्ये साहित्य प्राप्त झाले त्यामुळे प्रति आठवडा 0.5% या दराने दंडाची रक्कम रुपये 76,360/- ची वसुली करण्यात आली नाही.

2) करारनाम्यातील अटी व शर्ती क्रमांक 3 नुसार यंत्रे उभारुन कार्यान्वीत करुन तसेच प्रात्यक्षिक दाखवून तसे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर देयकांचे प्रदान करणे आवश्यक होते परंतु असे प्रमाणपत्र न घेताच देयकांचे प्रदान केले आहे.

3) महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेन्ट एजन्सी (मोडा) यांचे स्पेशिफिकेशन नुसार साहीत्य पुरविल्या बाबत चांचणी अहवाल घेण्यात आला नाही.

4) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिष्द बुलडाणा यांचे पत्रानुसार 27 सप्टेंबर 250 एल.पी.डी. व 32 सप्टेंबर 125 एल.पी.डी.चा पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले असताना पुरवठादाराने त्याप्रमाणे पुरवठा केला नाही.

5) 48 प्राथमीक आरोग्य केंद्रासाठी सोलर वॉटर हिटर पुरवठाधारकाने पुरविले परंतु नस्ती मध्ये 42 प्रा आ केंद्राना साहीत्य प्राप्तीच्या डीलेव्हरी चलान नस्तीत उपलब्ध आहे .उर्वरीत 6 प्रा आ केद्राना साहीत्य पुरविले किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणास सत्यता पडताळता आली नाही.

**3.570 शालेय मुलांची वैदयकीय तपासणी अंतर्गत औषधी दरकरार नुसार खरेदी न करणे**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासनाचे दरकरार असलेल्या कंपनीने दरकरारानुसार औषधी पुरवठा करण्यास नकार दिल्यावर जिल्हा परिषद ने निविदा मागवुन Gentamycin injection 80 mg-2ml या औषधीची निविदा मंजुर केली परंतु जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे पुरवठा आदेश क्रमांक 4214 दिनांक 04/03/2015 नुसार मंदार फार्मा यांना Gentamycion inj 40 mg-2ml चा पुरवठा आदेश दिला व संबधीताने वरील साहीत्य पुरविले. निविदे नुसार मंजुर औषधे खरेदी करणे आवश्यक असतांना त्यात बदल करुन औषधे खरेदी करण्यात आले.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक पीआरसी /1080/सीआर 1974/67/दिनांक 22 जुलै 1993 नुसार वाटप करण्यात आलेले औषधे त्याच प्रयोजनासाठी म्हणजे शालेय आरोग्य तपासणीसाठी उपयोगात आणल्या बाबत नस्तीत कोणतेच अहवाल उपलब्ध झाले नाही. त्यामुळे योजनेचा मुळ उददेश सफल झाल्याचे आढळुन आले नाही.

3) सदर औषधे हे शालेय आरोग्य तपासणीसाठी आश्रम शाळेतील विदयार्थी करीता वापरल्या बाबत प्राथमिक आरोग्य केंद्रावरील साठा नोंदवहीवरुन दिसुन आले नाही.

**3.571 जिल्हा परिषद उपकरातुन आयुर्वेदिक दवाखान्याकरिता औषधी खरेदीमधील अनियमितता**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 38) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे पत्र क्रमांक 4340 दिनांक 12/03/2015 नुसार पर्मवेदा प्रायव्हेट लिमिटेड मुंबई यांना आदुल्ला कफ सायरप 100ml औषधी बॉटल साठीपुरवठा आदेश देण्यात आला. परंतु चांचणी अहवाल हा दिनांक 10/02/2015 रोजीचा म्हणजे पुरवठा आदेशा पुर्वीचा आहे.

2) पर्मवेदा प्रायव्हेट लिमिटेड मुंबई यांचे प्रमाणक क्रमांक 942 सोबत जोडलेल्या मुळ बिलावर औषधीची कालबाहय मुदत आढळुन आली नाही. त्यामुळे कालबाहय औषधाचा पुरवठा केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**3.572 आदिवासी भागात भरारी पथकात दोन वाहने भाडेतत्वावर घेणेबाबत योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-1002/प्र.क्र.326/अ-5/सावि/मंत्रालय मुंबई, दिनांक 25/06/2004 अन्वये शासनाने योजना 11 महिने राबविण्याकरिता स्थायी निर्देश दिले आहे. आरोग्य विभाग अंतर्गत 2 भरारी पथकाकरिता वाहनाच्या भाडेपट्टीवर खर्च करण्यात आला.

1) पुरवठा आदेशानुसार वाहनाचा पुरवठा न करता वाहन उशिरा पुरविण्यात आले.

2) वापरलेल्या वाहना ऐवजी दुसऱ्या वाहनाच्या बिलाचे रूपये 1,01,485/- चे नियमबाह्य प्रदान दाखविले आहे.

3) वैद्यकीय अधिकारी यांना 2,500 किलोमीटर वाहनाचा वापर करून दुर्गम भागातील आदिवासींना आरोग्य सेवा पुरविणे आवश्यक असतांना तालुका आरोग्य अधिकारी रामटेक यांच्या चौकशी अहवालानुसार वाहनाचा वापर फार कमी झाला आहे. त्यामुळे वैद्यकीय अधिकारी यांनी योग्य सेवा दिली नसल्याचे दिसून येते.

4) लॉगबुकच्या नोंदीनुसार वाहन क्रमांक EK 0093 उपलब्ध नसतांना बिलाचे नियमबाह्य केलेले प्रदान रूपये 1,644/- वसुलपात्र ठरते.

**3.573 औषधाचा पुरवठा उशिरा केल्यामुळे दंडाची रक्कम कमी वसुलीबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** ॲन्टी रॅबीज व्हॅक्सीन चे 5010 नग रूपये 136.49 प्रमाणे दरकरारानुसार इंडीयन इमुन क्लोरीकल लिमीटेड, पुणे यांचेकडुन पुरवठा करण्यात आला. परंतु 60 दिवसाचे आत पुरवठा करावयाचा असतांना पुरवठा 32 दिवस उशिरा केलेला आहे. त्यामुळे वसुल करावयाच्या दंडाच्या रकमेपैकी कमी वसुल केलेली रककम रूपये 3,663/- वसुलपात्र ठरते.

**3.574 रजा प्रवास सवलतीबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** आरोग्य विभाग सन 2014-15 या आर्थिक वर्षाचे रजा प्रवास सवलतीचे देयक तपासले असता दिसून आलेल्या अनियमितता खालीलप्रमाणे आहे.

1) देयकात नमुद केलेला प्रवास व सादर केलेले रेल्वे तिकीट यात ठिकाणांची तफावत असल्याने प्रदान करण्यात आलेले रूपये 9,330/- वसुलपात्र आहे.

2) प्रवासभत्ता देयकासोबत प्रवास केल्याबाबत कोणताही पुरावा जोडलेला नाही.

**3.575 संगणक संच खरेदी करणेबाबत व इतर अनियमीतता.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** आरोग्य विभागाअंतर्गत शासन दरकरारानुसार शासन निधीतुन 5 संगणक संच खरेदी करण्याकरीता प्रमाणक क्रमांक 177, दिनांक 31/03/2015 नुसार रुपये 1,82,440/- खर्च करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर पुरवठाधारकासोबत शासनाने केलेला दरकरार दिनांक 10/04/2015 पर्यंत वैध आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद वर्धा, यांनी दिनांक 30/03/2015 ला पुरवठा आदेश दिले. लेखापरीक्षणास डिलिव्हरी मेमो उपलब्ध करुन न दिल्याने संगणक संच विहीत मुदतीत प्राप्त झाल्याची खात्री करता येत नाही.

2) दरकरारातील शेड्युल डि मध्ये बाब क्रमांक 4 नुसार व्हॅट ची रक्कम दरकरारातील दरामध्ये अंतर्भुत आहे. महाराष्ट्र शासन, उदयोग उर्जा कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 29/05/2000 अन्वये देयकातुन आयकर व वॅट कपात करणे आवश्यक असताना सदर कपाती केलेले नाही. देयकातुन 5 टक्के व्हॅट कपात न केल्याने रुपये 9,122/- वसुलपात्र आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 90 अन्वये प्राप्त साहीत्याची नोंद जंगम मालमत्ता नोंदवही नमुना 32 मध्ये घेण्यात आलेले नाही.

**3.576 एन्टी रॅबिज लस पुरवठा खर्चातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** प्रमाणक क्रमांक 971 दिनांक 31/03/2015 अन्वये 7800 एन्टी रॅबिज लस खरेदी करण्याकरीता शासन निधीतून रुपये 10,64,622/- खर्च करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) डिलिव्हरी चालान नाही, व्हॅक्सिन प्राप्त झाल्याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद, वर्धा यांची स्वाक्षरी नाही.

2) विहीत मुदतीपेक्षा 76 दिवसानी उशीराने साहीत्य प्राप्त झाल्याने प्रती आठवडा 0.5 टक्के प्रमाणे 10 आठवडयाचे रुपये 53,231/- दंड आकारण्यात येवुन सदर रक्कम देयकातुन कपात करण्यात आलेली नाही.

3) सदर व्हॅक्सीन वाटप केल्याबाबत वेगवेगळया आरोग्य संस्थाचे साठा रजिस्टर लेखापरीक्षणास सादर केलेले नाही. खर्चाचे उपयोगीता प्रमाणपत्र लेखापरीक्षणास सादर नाही.

**3.577 नियमाविरुध्द प्रदानाबाबत**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** प्रमाणक क्रमांक 225, दिनांक 31/03/2015, रक्कम 499974 M/S SYDLER REMEDIES PVT. LTD. MUMBAI. नुसार सन 2014-2015 मध्ये औषधी खरेदीवर जिल्हा परीषद सेस फंडातून खर्च करण्यात आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आरोग्य विभाग, जिल्हा परीषद, वर्धा चे सन 2014-2015 मध्ये उपरोक्त प्रमाणकान्वये खरेदी करण्यात आलेल्या औषधीचा बॅच क्रमांक 55022 व उत्पादन दिनांक (Manufacture Date) एप्रील 2015 आहे. दिनांक 31/3/2015 ला पुरवठा आदेश देऊन दिनांक 31/3/2015 ला औषधे प्राप्त झाल्याचे दाखवून खर्च केलेला आहे. उत्पादनापूर्वी खरेदी कशी केली याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

2) डिलिव्हरी चालान रेमिडिज प्रा. लि. औरंगाबाद नावाने आहे व प्रदान रक्कम रुपये 4,99,974/- सिडलर रेमिडिज प्रा. लि. मुंबई या नावाने आहे. तरी वसुलीची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**3.578 सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक योजनाबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, भंडारा येथिल सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक योजनेवर खर्च रुपये 18,00,000/- केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, झेडपीए/2008 दिनांक 20 जुन 2008 अन्वये जिल्हा परिषदेने राबविण्यात येणा-या विविध योजनांचे नियोजन व अंमलबजावनीचे वेळापत्रकाकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले. काही लाभार्थ्यांचे प्रकरण दिनांक 26/03/2015, 27/03/2015, 30/03/2015 ला प्राप्त असतांना दिनांक 31/03/2015 ला वर्षाचे अखेर खर्च दाखविणे ही गंभीर बाब आहे.

2) दोन लाभार्थीने कोणत्या दवाखान्यात शस्त्रक्रिया केल्याचे दवाखान्याचे नाव व दिनांक नमुद नाही तसेच शस्त्रक्रिया केल्याचे वैदयकीय अधिका-याचे प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे या योजनेचा लाभ अनुदेय नाही. संबंधीताकडुन रक्कम रुपये 20,000/- वसुल होणे आवश्यक आहे.

3) 10 लाभार्थ्यांचे बि.पी.एल क्रमांक व दारिद्रय रेषेखालील कार्ड क्रमांक नसतांना शासन निर्णय साफयो-2004/1511/प्र.क्र.297, दिनांक 24 एप्रिल 2007 प्रमाणे त्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय नाही त्यामुळे संबंधीताकडुन रकमांची परीगणना करुन रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

4) एक लाभार्थी नागपुर जिल्हयातील असल्यामुळे त्या जिल्हयातील लाभ घेतले नसल्याबाबत प्रमाणपत्र देयकासोबत जोडणे आवश्यक होते. तोपर्यंत रुपये 10,000/- मान्य करण्यात येत नाहीत.

5) दोन लाभार्थ्यांचे लाभ वाटप नोंदवहीवर स्वाक्षरी नसतांना रुपये 20,000/- चे रोखपुस्तकावर खर्च नमुद केल्यामुळे वसुल होणे आवश्यक आहे.

6) उपयोगिता व विनियोग प्रमाणपत्र देयकासोबत जोडणे आवश्यक आहे.

7) लाभार्थ्यांच्या बँकेच्या खात्यावर रेखांकित धनादेश जमा झालेबाबत लाभार्थ्यांनी दिलेल्या आगाउ पोचपावत्या देयकासोबत जोडणे आवश्यक आहे.

**3.579 प्राथमिक आरोग्य केन्द्राकरिता ई.सी.जी व बेबी वार्मर खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, भंडारा येथील सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, प्राथमिक आरोग्य केन्द्राकरिता ई.सी.जी.च बेबी वार्मर खरेदीवर रुपये 14,63,400/- चे खर्च दर्शविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे कलम 83(3) अन्वये खरेदी पुर्वी त्याची प्रयोगशाळेकडुन गुणवत्ता तपासणी करुन अहवाल समाधानकारक आल्यानंतर रक्कमाचे प्रदान करणे आवश्यक असतांना नियमाबाहयपणे रक्कमाचे प्रदान करण्यात आले.

2) शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक/मागास1093/प्रक्र 123934 दिनांक 1/9/1999 नुसार साहित्याचे खरेदी तथा वाटप त्याच वित्तीय वर्षात होणे आवश्यक असतांना सन 2015-2016 मध्ये साहित्याचे वाटप करण्यात आले होते. त्यामुळे योजनेचा उददेश सफल झाला नाही.

3) साहित्य वाटपाचे उपयोगिता व विनियोग प्रमाणपत्र आढळुन आले नाही.

4) बालकांच्या आरोग्यात सुधारणा झाल्याबाबत वैदयकिय अधिकाऱ्याचा अहवाल नस्तीत आढळुन आला नाही.

5) आयकर अधिनियम 1962 चे कलम 194 अन्वये 2 टक्के आयकर व आयकरवर 2 टक्के अधिभारची परिगणना करुन पुरवठाधारकाच्या देयकातुन कपात करणे आवश्यक आहे.

**3.580 आयुर्वेदिक दवाखान्यात सुविधेत वाढ योजना अंतर्गत औषधी साहित्य पुरवठा खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** आरोग्य विभाग, जिल्हा परीषद, भंडारा येथील सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, आयुर्वेदिक दवाखान्यात सुविधेत वाढ योजना अंतर्गत औषधीसाहित्य पुरवठा खरेदीवर रुपये 2,21,850/- चा खर्च दर्शविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मागणी पेक्षा जास्त खरेदी केली असल्यामुळे 83 नगाची रुपये 306/- प्रमाणे एकुण रुपये 25,398/- चा अतिरिक्त खर्च करण्यात आला.

2) प्राथमिक केन्द्राअंतर्गत औषध वाटप केल्याबाबतचा अहवाल व त्यासंबंधीचे उपयोगिता व विनियोग प्रमाणपत्र आढळुन आले नाही.

3) जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा यांचे अटी व शर्ती प्रमाणे जिल्हा वार्षिक योजनेच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र, खर्चाचे ताळमेळ व विनियोग लेखे इत्यादी बाबत अजून पावेतो कार्यवाही पुर्ण झालेली नाही.

**3.581 प्राथमिक आरोग्य केंद्र, कोल्हारी येथे इमारत दुरुस्ती आवार भिंत पाणी पुरवठयाची व्यवस्था करणेबाबत**.

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9)** - कामाचे अंतिम प्रमाणक क्रमांक 2518, दिनांक 16/03/2015 रुपये 2,03,609/- चे लेखापरिक्षण केले असता कंत्राटदारास केलेल्या प्रदानाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंदाजपत्रकातील नमुद परिमाणापेक्षा नियमबाहय जादा काम केल्याने रुपये 41,791/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

2) शासन निर्देशानुसार देयकातुन 1 टक्का विमा रकमेचे रुपये 4,993/- कपात केलेली नाही.

3) बी-1 निविदा करारातील अट क्रमांक 2 प्रमाणे दंडात्मक कार्यवाही न केल्याने रुपये 43,551/- चे शासन नुकसान झालेले आहे.

**3.582 प्राथमिक आरोग्य केंद्र, कोडेलोहारा येथे आवार भिंत बांधकाम.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10)** - प्रमाणक क्रमांक 3338, दिनांक 31/03/2015 रुपये 2,75,861/- चे लेखापरीक्षण केले असता कंत्राटदारास केलेल्या प्रदानाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंदाजपत्रकातील नमुद परिमाणापेक्षा नियमबाहय जादा काम केल्याने रुपये 11,640/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

2) शासन निर्देशानुसार देयकातुन 1 टक्का विमा रकमेचे रुपये 3,773/- कपात केलेली नाही.

3) बी-1 निविदा करारातील अट क्रमांक 2 प्रमाणे दंडात्मक कार्यवाही न केल्याने रुपये 30,248/- चे शासन नुकसान झालेले आहे.

**3.583 ग्रामीण भागातील हृदयरोग/कर्करोग/किडनी शस्त्रक्रियेकरीता आर्थिक मदत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 च्या कलम 100 (अ) मधिन तरतुदीनुसार ग्रामीण भागातील हृदयरोग/कर्करोग/किडनी शस्त्रक्रियेकरीता 4 लाभार्थ्यांना एकुन रक्कम रुपये 60,000/- अनुदान वाटप करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक एल.एल.सी. 2002/प्र.क्र.4226/24, दिनांक 12/11/2002 अन्वये दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडणे आवश्यक असतांना 4 ही लाभार्थ्यांनी सदर प्रमाणपत्र जोडलेले आढळलेले नाही तसेच लाभार्थ्याने शासकिय रुग्णालयात उपचार घेतलेले नाही याबाबतचे प्रमाणपत्रही लाभार्थ्यांनी जोडलेले नाही.

2) धनादेश रुग्णालयाचे नावे न देता लाभार्थीचे (रुग्णाचे) नावे दिल्याने वित्तीय औचीत्याचे पालन झाले नाही.

3) जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रमाणपत्रही 4 ही लाभार्थ्यांचे जोडलेले आढळले नाही. तरी नमुद शासन निर्णयान्वये तरतुदीचा अवलंब झालेला नाही. त्यामुळे झालेले खर्च रक्कम रुपये 60,000/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

**3.584 संचालनालय स्तरावरुन प्राथमिक आरोग्य केंद्राना औषधीचा पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** प्रमाणक क्रमांक 16418 दिनांक 23/11/2013 रुपये 1,28,609/-, प्रमाणक क्रमांक 048(31) दिनांक 14/02/2014 रुपये 5,40,098/-, प्रमाणक क्रमांक 16385 दिनांक 13/11/2013 रुपये 3,27,600/-, प्रमाणक क्रमांक 04192 दिनांक 30/12/2013 रुपये 2,08,440/-, प्रमाणक क्रमांक 172, दिनांक 13/03/2015 रुपये 19,452/- उपरोक्त प्रमाणके 1 ते 5 अन्वये संचालनालय स्तरावरुन रुपये 11,96,923/- ची औषधिंची खरेदी करण्यात आलेली आहे. सदर खरेदी ही सन 2013-14 ची असल्यामुळे ती सन 2013-14 चे अखर्चित निधीमधुन संचालकनालय स्तरावरुन पुरवठा करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) m/s. Hindustan Labcare, Mumbai यांचे साहित्य साठा नोंदवही क्रमांक संचालक- 7 अे मधिल पृष्ठ क्रमांक 21 वर दिनांक 27/11/2013 ला साहित्य प्राप्तीची नोंद आहे. त्या नोंदीवर जिल्हा आरोग्य अधिकारी व भांडार निरिक्षक यांची स्वाक्षरी नाही.

2) m/s Astra Lifecare (1) pvt.ltd., Ahmedabad चे साहित्यांची नोंद साठा नोंदवही क्रमांक संचालक 7 अे 3 (2013-14) पृष्ठ क्रमांक 93 वर दिनांक 17/02/2014 रोजी साहित्य प्राप्तीची नोंद आहे. पुरवठा आदेशातील अटीप्रमाणे पुरवठा आदेश क्रमांक 266 दिनांक 07/12/2013 मधिल अटीप्रमाणे 60 दिवसाची मुदत आहे. याप्रमाणे 12 दिवस उशिराने साहित्य प्राप्त झाले असल्यामुळे रुपये 5410/- विलंब दंडाची रक्कम वसुलपात्र ठरते.

3) उपरोक्त प्रमाणक क्रमांक 1 ते 4 पर्यंतची मुळ खर्च प्रमाणके लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही.

4) माननिय संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे दिनांक 02/04/1990 चे आदेशान्वये प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्र यांचेकडील औषधिंची आढावा घेवुन त्याप्रमाणात औषधिंची खरेदी करण्यात यावी. परंतु आढावा घेतल्याबाबतचा अहवाल किंवा इतर पुरावा नस्तीमध्ये किंवा लेखापरीक्षणास प्राप्त झाला नाही.

5) दिनांक 02/04/1990 चे आदेशाप्रमाणे आरोग्य केंद्रात येणाऱ्या संख्येवर त्यांची अ,ब व क अशी वर्गवारी केलेली आहे. औषधांचा पुरवाठा करतेवेळी प्राथमिक आरोग्य केंद्राची वर्गवारी लक्षात ठेवुनच पुरवठा करणे आवश्यक असतांना तश्याप्रकारचा अहवाल सबंधित नस्तीमध्ये उपलब्ध नसुन लेखापरीक्षणास प्राप्त झाला नाही.

6) प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी व उपकेंद्रासाठी कोणतीही औषधी घ्यावयाची असल्यास ती संचालनालय, आरोग्य विभाग, मुंबई यांचेकडुन प्राप्त यादीतीलच औषधी खरेदी करावयावी असल्यामुळे पुरवठा आदेशामध्ये त्या औषधींचा अनुक्रमांक नोंदविण्यात यावा जेणेकरुन त्याबाबतची लेखातपासणी करणे सायीचे होईल.

**3.585 आदीवासी उपयोजनांतर्गत संवेदनशील आदीवासी भागातील माता ग्रेड 3 व 4 च्या मुलींना औषधी खरेदी करणेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** आदीवासी उपयोजनांतर्गत संवेदनशील आदीवासी भागातील माता ग्रेड 3 व 4 च्या मुलींना औषधी खरेदीकरीता रुपये 24,68,290/- अनुदान वाटप करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्राथमिक आरोग्य केंद्राकडुन औषध प्राप्तीबाबतचे मागणी अहवाल नस्तीला आढळुन आले नाही. प्राथमिक आरोग्य केंद्राकडे औषधी शिल्लक असतांना अवास्तव मागणी नोंदविण्यात आल्याचे साठापुस्तकांवरुन आढळुन आले. वर्ष अखेर औषधी वाटपाविना शिल्लक असल्याचे साठापुस्तकांवरुन आढळुन आले.

२) औषधे डब्लु एच ओ जी, आयएसआय, बीआयएस असे प्रमाणपत्र प्राप्त करुन खरेदी करणे आवश्यक असतांना, तसे करण्यात आलेले नाही.

3) एकुण औषध मागणीच्या 35 टक्के औषधी ही हाफकिन महामंडळाकडुन व उर्वरीत 65 टक्के औषधी ही शासनाच्या दर करारावरील कंपन्याकडुन खरेदी करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही झालेली नाही.

4) औषधी खरेदी केल्यानंतर औषधाचे वाटप सर्व केंद्राच्या सरासरी उपस्थितीनुसार व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या व क्रमवारप्रमाणे करणे आवश्यक आहे. परंतु तसे न करताच औषधांचे वाटप केलेले आहे.

5) औषधे व साहीत्याचे विनियोगाबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आल्याचे लेखापरीक्षणात आढळुन आले नाही.

6) जी औषधी खरेदी आदिवासी केंद्रासाठी केलेली आहेत ती औषधी त्याच आदीवासी केंद्रांना वाटप केल्याचे लेखापरीक्षणात आढळून आले नाही.

**3.586 माता व कुपोषित बालकांना औषधोपचार अंतर्गत औषधे/साहित्य खरेदी खर्चाच्या अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** माता व कुपोषित बालकांना औषधोपचार अंतर्गत औषधे/साहित्य खरेदीसाठी एकुण रक्कम रुपये 68,84,572/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजने अंतर्गत खरेदी केलेल्या औषधी / साहीत्य खर्चाबाबतची नस्ती व बिलाचे तपासणीत असे निदर्शनास आले की, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक डिपीआर/1093/33/सीआर/03/10/1993, दिनांक 15/03/1993 प्रमाणे एकुण औषधी मागणीच्या 35 टक्के औषधी हॉफकीन महामंडळाकडून व उर्वरीत 65 टक्के औषधी ही शासन मान्य कंपनीकडून खरेदी करणे आवश्यक असतांना सदर शासन निर्णयाप्रमाणे औषधी खरेदीची अंमलबजावणी झाल्याचे आढळले नाही.

2) साठापंजी  रजिस्टर नमुना 33 ला काही पेजवर जिल्हा आरोग्य अधिकारी/सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या आढळल्या नाही.

3) महाराष्ट्र शासन, वैद्यकीय शिक्षण व औषध द्रव्ये विभाग, क्रमांक डी-1088/15सीआर-230/88/एमडी-4(ब), दिनांक 31/08/1990 मधिल परिच्छेद क्रमांक 32, अन्वये देयकापोटी अदा करावयाच्या रकमेपैकी 80 टक्के रक्कम औषधी प्राप्त झाल्यावर व 20 टक्के रक्कम खरेदी औषधीचे शासनमान्य प्रयोगशाळेतुन चाचणी अहवाल (प्रमाणपत्र) प्राप्त झाल्यानंतर अदा करावयाची असतांना बिलाचे एकत्रित 100 टक्के प्रदान कोणत्या प्राधिकारानुसार करण्यात आले याबाबत स्पष्टीकरणे होणे आवश्यक आहे.

4) भारतीय आयकर अधिनियम 1961 चे कलम 194(क) नुसार 2 टक्के आयकर रक्कम देय बिलातून कपात केल्याचे लेखापरिक्षणास आढळले नाही. याबाबत स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अब.यु.डी.2011/ प्र.क्र.5/का-6, दिनांक 12/05/2011 अन्वये आदिवासी उपयोजना अंतर्गत उपलब्ध करून दिलेली औषधे फक्त आदिवासी लोकांकरिता व आदिवासी उपयोजनाअंतर्गत खर्च करण्यात यावी, असे नमुद आहे. सदर शासन निर्णयाप्रमाणे अंमलबजावनी झाल्याबाबतचा अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही. सदर अहवाल प्राप्त करणे आवश्यक आहे.

6) प्राथमिक आरोग्य केंद्राकडून औषधाचे विनियोग प्रमाणपत्र/अहवाल  प्राप्त करुन लेखापरिक्षणास उपलब्ध केले नाहीत.

**3.587 गरोदर स्त्रियांना मातृत्व अनुदानाचा लाभ देणेबाबत**.

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** गरोदर स्त्रियांना मातृत्व अनुदानाचा लाभ देणे यावर एकुण रुपये 4,06,400/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) राज्य कुटूंब कल्याण कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांचे पत्र क्रमांक मातृत्व अनुदान/कक्ष-10/न.क्र.115/34107/44/14,दिनांक 24/06/2014 अन्वये मातृत्व अनुदानाचे वाटप रोख रुपये 400/- हे गरोदरपणामध्ये लाभ देण्याचे असतांना संपुर्ण देयके 31/03/2015 मध्ये काढुन वाटप करण्यात आले आहे. सर्व गरोदर मातांना लाभ प्रसुतीनंतर मिळाल्याचे दप्तरावरुन आढळुन येते. उपरोक्त पत्रात नमुद केलेल्या अटी व शर्तीचे पालन न करता रुपये 4,06,400/- खर्च करण्यात आले आहे. यावरुन योजनेचे मुख्य उदिष्ट साध्य झाला नाही.

**3.588 अभिलेखे लेखापरिक्षणास सादर न करणेबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** मातृत्व अनुदान रुपये 1,37,200/- चे अभिलेखे लेखापरिक्षणास सादर न करणे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आरोग्य विभाग, जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-15 चे लेखापरिक्षण करतेवेळी प्रमाणक क्रमांक 2983,दिनांक 31/03/2015 अन्वये मातृत्व अनुदान योजनेवर रुपये 1,37,200/- मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे आदेश जिपग/आरोग्य/योजना/ 1336/2015,दिनांक 30/03/2015 अन्वये खर्चास मंजूरी प्रदान केली आहे. व त्याप्रमाणे प्रमाणकान्वये खर्च करण्यात आला आहे. याबाबत साठा नोंदवही वाटप केल्याची नस्ती व इतर अभिलेखाची मागणी वारंवार करुन व अर्धसमास पत्र क्रमांक क्यु 02,दिनांक 21/02/2016 अन्वये मागणी करुनही लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे केलेला खर्च रुपये 1,37,200/- लेखापरिक्षणास मान्य नाही.

**3.589 सावित्रिबाई फुले कन्याकल्याण पारितोषिक योजना अंमलबजावनितील अनियमितता.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** सावित्रिबाई फुले कन्याकल्याण पारितोषिक योजनेवर एकुण रक्कम रुपये 4,80,000/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक साफुयो-2004/ 1511/प्र.क्र.297 कु.क 3,दिनांक 24/04/2007 चे नियम क्रमांक पाच नुसार संपुर्ण तपशिलासह भरुन दिलेले अर्ज कागदपत्रासह तीन वर्षाच्या विहीत मुदतीपर्यंत स्विकारावेत. मात्र कोणत्याही परिस्थितीत कोणताही अर्ज सहामहिण्यापेक्षा अधिक काळ प्रलंबित ठेवता येणार नाही.असे नमुद असतांना प्रमाणक क्रामांक 158, अन्वये लाभ दिलेल्या श्री.विमल कुंज शिल, मुक्काम पोष्ट तालुका एटापल्ली यांचा केस क्रमांक 90, सन 2009-2010 चे प्रकरण सन 2014-2015 मध्ये निकाली काढण्यात आल्याचे दिसुन आले. तसेच विमल कुंज शिल मुक्काम पोष्ट तालुका एटापल्ली यांचे अर्ज प्रस्तावाची पडताळणी केली असता, त्यात शिधापत्रिका दिसुन आली नाही.

2) श्रीमती संगीता विकास गावडे, घोट यांचा अर्ज प्रस्तावासोबत बंडु सखाराम गावडे यांचे दारीद्ररेषेखालील ग्रामपंचायत, वाकडीने दिलेले प्रमाणपत्र असुन बंडु गावडे हे विकास गावडेचे काका आहेत.

3) श्री.हरिच्छंद्र तिमाजी कार, मुकाम कन्हाळगाव, पोष्ट पिंपळगाव (बु) तालुका लाखांदुर, जिल्हा भंडारा शस्त्रक्रीया केल्याचा दिनांक 29/07/2009 आहे. शासन निर्णयानुसार लाभार्थी शस्त्रक्रिया केल्यापासुन तीन वर्षाच्या आत अर्ज करणे आवश्यक असतांना सदर शस्त्रक्रीयेस 3 वर्षाच्या वर कालावधीनंतर सदर अर्ज स्विकृत केलेला असुन सदर लाभार्थी हा मुळात भंडारा जिल्हातील असुन, सदर लाभार्थ्यांचे भंडारा जिल्हापरिषदेकडून लाभ न घेतल्याबाबतचे प्रमाणपत्र अर्ज प्रस्तावासोबत दिसुन आले नाही.

4) प्रमाणक क्रमांक 177, अन्वये प्रदान केलेल्या लाभामध्ये काही लाभार्थी (केस क्रमांक 34,35,42,47) हे बाह्य चंद्रपुर जिल्हातील आहेत. सदर लाभार्थ्यांने बाह्य चंद्रपूर जिल्ह्यातुन लाभ न घेतल्याबाबतचे प्रमाणपत्र अर्ज प्रस्तावासोबत दिसुन आले नाही.

5) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक-साफुयो-2004/1511/प्र.क्र.297/कु.क.3,दिनांक 24/04/2007 चे नियम क्रमांक 8 नुसार या योजनेअंतर्गत प्रत्येक महिण्यात प्राप्त झालेले अर्ज त्यापैकी अपूर्ण व निकाली काढलेल्या अर्जाचा अहवाल प्रत्येक महिण्याच्या दहा तारखेपर्यंत अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटूंब कल्यांण, माता बालसंगोपन आणि शालेय आरोग्य, पुणे यांचे कडे सादर करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केल्याचे आढळुन आले नाही.

6) उपरोक्त शासन निर्णयातील अनुक्रमांक 12 नुसार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सदर योजनेखाली पात्र ठरलेल्या जोडप्यांचे जिल्हा स्तरावर मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी देऊन सत्कार केल्याचे अभिलेखे आढळून आले नाही.

**3.590 0 ते 6 वयोगटातील बालकांना जंतविरोधक लोहयुक्त, जिवनसत्वयुक्त औषधांचा पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** 0 ते 6 वयोगटातील बालकांना जंतविरोधक लोहयुक्त, जीवनसत्वयुक्त औषधांचा पुरवठा करणे यासाठी प्रमाणक क्रमांक 1349, दिनांक 31/03/2015 अन्वये मे. कोणार्क रिमेडीज यांना रुपये रक्कम 2,02,020/- प्रदान करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेश क्रमांक मुकाअ/जिपग/औषध भांडार/13 वने/3467, दिनांक 29/09/2014 अन्वये मे. गल्पा लेबोरेटरीज मुंबई, यांना औषधी पुरवठा करणेबाबत, आदेश दिले असतांना जिल्हा परिषद आरोग्य विभागानी सदर कंपनीकडून औषधी खरेदी करुन सदर कंपनीस रुपये 2,02,020/- प्रदान केल्याचे दिसुन आले. त्यामुळे झालेल्या खरीदीचा व्यवहार संशयास्पद व नियमबाह्य आहे.

2) संचालनालय, आरोग्य सेवा यांचे निर्देशानुसार आवश्यक औषधी साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी आरोग्य विभागाने प्राथमिक केंद्राकडून मागणी अहवाल प्राप्त केलेला नाही.

**3.591 आकस्मिक खर्चाचे देयकबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** आरोग्य विभाग, जिल्हा परिषद औरंगाबादचे सन 2014-2015 हया वित्तीय वर्षात आकस्मिक खर्चाचे देयकान्वये रक्कम रुपये 50,000/- चा खर्च केलेला आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरील आकस्मिक खर्चाचे देयकामध्ये कालबाह्य देयकांचे प्रदान केले आहे, अशी देयके प्रदान करणे पूर्वी मुंबई वित्तीय नियम 1959 चे नियम 39(ब) प्रमाणे सक्षम प्राधिकारी यांची मंजुरी घेतलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 44(1)नुसार कालबाह्य मागणीचे देयकास मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजुरी घेण्यात आलेली नाही.

3) सदरील आकस्मिक खर्चाचे देयकामध्ये समाविष्ट असलेली इंधन देयके विभाग प्रमुखांनी प्रमाणित केलेली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 79 नुसार आवश्यक कार्यवाही केलेली नाही.

**3.592 साथरोगग्रस्त मेडीक्लोर खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदर खरेदीकरीता रक्कम रुपये 6,99,600/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग क्रमांक एच.बी.पी/1089/ 160/एम.डी.,दिनांक 20/04/1990 मधील उप परीच्चेद क्र. ८ नुसार वित्तीय वर्ष सुरु झाल्यानंतर एक महिन्याच्या आत मागणी करणे आवश्यक असताना विभागाने विलंबाने मागनि नोंदविली असल्याने आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांना विलंबाने औषधांचा पूरवठा झाला.

2) संचालक आरोग्य सेवा, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक 6/स.आ./औषधी/कक्ष 2,दिनांक 11/12/1988 नुसार औषधींचे वाटप प्रा.आ.केंद्रांच्या अ, ब, क वर्गवारीनुसार होणे आवश्यक असताना विभागाने अशी वर्गवारी केल्याचे दिसून आले नाही.

3) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग क्रमांक डी.पी आर/1080/1515/सी आर 230/एम.ई.डी. 4(ब),दिनांक 31/08/1990 मधील परीच्चेद क्र.३२ नुसार बिलापोटी अदा करावयाच्या एकूण रकमेच्या 80 टक्के रक्कम औषधी प्राप्त झाल्यानंतर व 20 टक्के रक्कम गुणवत्ता तपासणीनंतर अदा करावयाची आहे. सदरील नियमाचे काटेकोरपणे पालन करण्यात येत नाही.

4) सहसंचालक, आरोग्य सेवा मुंबई पत्र क्रमांक स.आ.सं./औ.दरकरार/कक्ष 7(अ)/2006,दिनांक 02/06/2006 नूसार नवीन दर करार अस्तिवात येईपर्यंत जुन्या दर करारानूसार औषधी खरेदी करावी व नवीन दरकरार

अस्तित्वात आल्यानंतर पुरवठादार कोणत्याही फरकाची रक्कम मागणी करणार नाही असे हमीपत्र घेऊन खरेदी करावी असे आहे. परंतू आरोग्य विभागाने पुरवठादाराकडून असे हमीपत्र घेतलेले नाही.

5) आरोग्य विभागाने एकंदर वार्षिक मागणी दर्शविली आहे. प्रा. आरोग्य केंद्राकडून मागणी पत्रके मागवून घेतली नाहीत. त्यामुळे खरेदी केलेल्या औषधांची गरज होती याबाबत खात्री करता आली नाही.

6) महाराष्ट्र शासन ग्रामीण विकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेड.पी.ए-2008/प्र.क्र.446/वित्त 9,दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषदेने योजना राबविणे बाबत वेळापत्रक ठरवून दिले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असताना विभागाने अशी कार्यवाही न करता वर्षाखेरीसच खरेदी केली आहे.

7) खरेदी केलेल्या औषधाबाबत डिलेवरी चलन पहावयास मिळाले नाही.

**3.593 जिल्हा परिषद उपकरातून साथरोग प्रतिबंध औषध खरेदी अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदर खरेदीकरीता रक्कम रुपये 9,99,460/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग क्रमांक एच.बी.पी /1089/160/एम.डी.दिनांक 20/04/1990 मधील उप परीच्छेद क्र. 8 नुसार वित्तीय वर्ष सुरु झाल्यानंतर एक महिन्याच्या आत मागणी करणे आवश्यक असताना विभागाने विलंबाने मागनि नोंदविली असल्याने आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांना विलंबाने औषधांचा पूरवठा झाला.

2) संचालक आरोग्य सेवा, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक 6/स.आ./औषधी/कक्ष 2, दिनांक 11/12/1988 नुसार औषधींचे वाटप प्रा.आ.केंद्रांच्या अ, ब, क वर्गवारीनुसार होणे आवश्यक असताना विभागाने अशी वर्गवारी केल्याचे दिसून आले नाही.

3) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग क्रमांक डी.पी आर/1080/1515/सी आर 230/एम.ई.डी.4(ब),दिनांक 31/08/1990 मधील परीच्चेद क्र.32 नुसार बिलापोटी अदा करावयाच्या एकूण रकमेच्या 80 टक्के रक्कम औषधी प्राप्त झाल्यानंतर व 20 टक्के रक्कम गुणवत्ता तपासणीनंतर अदा करावयाची आहे. सदरील नियमाचे काटेकोरपणे पालन करण्यात येत नाही. त्याप्रमाणे अनुपालन सादर करावे.

4) सहसंचालक, आरोग्य सेवा मुंबई पत्र क्रमांक स.आ.सं./औ.दरकरार/कक्ष 7(अ)/2006, दिनांक 02/06/2006 नूसार नवीन दर करार अस्तित्वात येईपर्यंत जुन्या दर करारानूसार औषधी खरेदी करावी व नवीन दरकरार अस्तित्वात आल्यानंतर पुरवठादार कोणत्याही फरकाची रक्कम मागणी करणार नाही असे हमीपत्र घेऊन खरेदी करावी असे आहे. परंतू आरोग्य विभागाने पुरवठादाराकडून असे हमीपत्र घेतलेले नाही.

5) आरोग्य विभागाने एकंदर वार्षिक मागणी दर्शविली आहे. प्रा.आरोग्य केंद्राकडून मागणी पत्रके मागवून घेतली नाहीत. त्यामुळे खरेदी केलेल्या औषधांची गरज होती याबाबत खात्री करता आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामिण विकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेड.पी.ए.2008/प्र.क्र.446/वित्त 9,दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषदेने योजना राबविणेबाबत वेळापत्रक ठरवून दिले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही न करता वर्षाअखेरीस खरेदी केल्याचे दिसून येते.

**3.594 जिल्हा परिषद केंद्र/उपकेंद्र साहित्य सामुग्री खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदर खरेदीकरीता रक्कम रुपये 2,90,909/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन दरपत्रक दिनांक 7 मार्च 2014 अन्वये प्रती नग रुपये 8,321/- असताना देयकांअध्ये रुपये 10389-61 दर्शहुन बील पारित करण्यात आला.देयकातील दर प्रती नग 10389.60* 28=290909 दरसुची नुसार दर प्रतिनग 8321* 28=232988 त्यामुळे वसुलपात्र रक्कम =57921

2) पुरवठा आदेश झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत पुरवठा करणे बंधनकारक असताना पुरवठा प्राप्त दिनांक 18/12/2014 झाला असुन 17 दिवस विलंब झाला आहे.दरकरारातील अटीनुसार प्रती आठवडा 0.5 टक्के

दराने प्रती आठवडा विलंब आकार,देयकाच्या रक्कमेवर आकारण्यात यावा असे नमुद आहे.पुरवठा विलंब दिवस 17 दोन आठवडे वसुलपात्र रक्कम 29,08/-

3) महाराष्ट्र शासन वैद्यकीय व औषधी द्रव्य विभाग, निर्णय क्रमांक डीपीआर/ 1080/1515/सी आर 230/88/एम ईडी 4 (ब),दिनांक 31/08/1990 मधील परिच्छेद क्र. 32 नुसार बिलापोटी अदा करावयाच्या एकुण रक्कमेच्या 80 टक्के रक्कम औषधी प्राप्त झाल्यानंतर व 20 टक्के रक्कम गुणवत्ता तपासणी नंतर अदा करावयाची आहे. परंतु औषधांची गुणात्मक तपासणी न करता 100 टक्के रक्कम अदा करण्यात आली आहे.

**3.595 कंत्राटी वाहन चालकांना नियुक्तीबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** प्राथमिक आरोग्य केंद्राकडील रुग्णवाहिका चालविण्यासाठी कंत्राटी पध्दतीने संस्थेमार्फत वाहन चालक नियुक्ती करुन चेअरमन, किर्ती सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था, औरंगाबाद व एकता सुशिक्षीत बेरोजगार संस्था यांना रुपये 16,71,965/- अदा केले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्रमांक. स.आ.से./लिपीक कंत्राटी/कक्ष-7/05 दिनांक 25/02/2005 नुसार कंत्राटी पध्दतीने वाहनचालकाची भरती करणेबाबत मार्गदर्शक तत्वानुसार वाहनचालक सेवा पुरवणेबाबत किर्ती सुशिक्षीत बेरोजगार सहकारी संस्था, औरंगाबाद यांना दिनांक 01/06/2013 ते 31/05/2014 या कालावधीकरीता कंत्राट देण्यात आल्याचे दिसुन आले. सदरील कंत्राटदाराची मुदत दिनांक 31/05/2014 रोजी संपली असतांना तसेच नवीन कंत्राट देणेसाठी दिनांक 01/06/2014 रोजी ई टेंडरींग प्रक्रीया पुर्ण झाली असतांना शिक्षक मतदार संघाच्या आचार संहितेच्या कारणामुळे जुने कंत्राटदार किर्ती सुशिक्षीत बेरोजगार सहकारी संस्था औरंगाबाद यांना दिनांक 01/06/2014 ते 31/08/2014 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली, त्यामुळे संस्थेस अदा करणेत आलेली रक्कम रुपये 8,14,640/- लेखापरिक्षणास मान्य करणेत येत नाही.

2) सन 2014-2015 करिता जिल्हा परिषदेने दिनांक 14/02/2014 रोजी दैनिक लोकप्रश्न या वर्तमानपत्रात जाहिरात देवुन ई टेंडरींगद्वारे प्राप्त एकुण सात निविदांपैकी कमी दराची निविदा एकता सुशिक्षित बेरोजगार संस्था, नेकनुर यांना ठेका मान्य केला. अटी व शर्तीनुसार वाहनचालकाचा विमा उतरविणे आवश्यक असताना सदरील कार्यवाही झाली नाही, संस्थेची पात्रता ,पात्र वाहनचालकाचा तपशिल, ड्रायव्हिंग लायसन्स, वैद्यकीय प्रमाणपत्र, विमा पॉलीसी तसेच वाहनचालक हे संस्थेचे नोदंणीकृत कामगार असले बाबत तसेच चालकांचा तांत्रिक तपासणी अहवाल इ. माहिती निविदे सोबत जोडण्यात आली नाही.

3) शासन वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक आयकर-1007/प्र.क.105/प्र.5 दिनांक 22/02/2008 मध्ये सुचीत केल्या प्रमाणे आयकर कलम 194 जे नुसार संस्थेकडुन सदरील रक्कमेवर आयकराची रक्कम रुपये 1,67,197/ वसुलपात्र ठरते.

**3.596 जिल्हा नियोजन समिती अंतर्गत प्राप्त अनुदानातून उपकेंद्र औषधी योजनेअंतर्गत औषधी खरेदीतील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, परभणी चे सन 2014-15 चे लेखापरीक्षण अंतर्गत जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त अनुदानातून उपकेंद्रासाठी केलेल्या औषध खरेदीमध्ये अनियमितता आढळून आल्या आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक परास-1096/प्र.क्र.872/जल-2(ब), दिनांक 10/10/1996 नुसार जिल्हयातील आरोग्य केंद्राकडून त्यांची वार्षीक मागणी घेऊन एकत्रीतरीत्या खरेदी करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केल्याचे अभीलेख्यावरुन स्पष्ट होत नाही

2) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक डीपीआर-2003/प्र.क्र.333/ 2003/प्रशासन-1, दिनांक 02/04/2004 नुसार हाफकीन औषधी निर्मितीस प्रोत्साहन देणे, खरेदीची क्लीष्ठता, विलंब टाळणे व इतर कंपन्याकडून सर्वसाधारणपणे होणारी संभाव्य फसवणूक टाळणेसाठी हॉफकीन जीव औषधी महामंडळ,

मुंबई, अंजिठा फार्मा जळगांव व हिंदुस्थान अँटीबायोटीक्स इंडीया लिमीटेड, पुणे या शासन उपक्रमांनी त्यांच्या स्वत:च्या जागेत परवान्यांतर्गत उत्पादीत केलेली व त्यांच्या मक्तेदारी असलेली औषधी 75 टक्के व त्यांचे जागेत उत्पादीत परंतू मक्तेदारी नसलेली औषधी गरजेनूसार 37.5 टक्के प्राधान्याने खरेदी करणे आवश्यक आहे. परंतू आरोग्य विभागाने विहीत टक्केवारीनुसार खरेदी केलेली लेखापरीक्षणात दिसून आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, वैदयकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक डीपाआर-1088/1515/सीआर-230/88/एमइडी-(अ), दिनांक 31/08/1990 मधील परिच्छेद क्रमांक 32 नुसार 80 टक्के रक्कम औषध प्राप्त झाल्यावर व 20 टक्के रक्कम साहित्याची तपासणी झाल्यावर देयकाची रक्कम प्रदान करावयाचे असताना औषधी पुरवठयानंतर एकदाच पुर्ण रक्कम प्रदान केली आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 79 प्रमाणे उपप्रमाणके विरुपीत करण्यात आलेली नाहीत.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पीआरसी-1083 /सीआर/1974-67, दिनांक 22/07/1993 नुसार उपयोगिता प्रमाणपत्रे उपलब्ध झालेले नाहीत.

**3.597 जिल्हा परिषद सेस मधून सोलर लाईट व सोलर वाटर हिटिंग बसविणे कामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, परभणी चे सन 2014-15 चे लेखापरीक्षण अंतर्गत जिल्हा परिषद सेस मधून सोलर लाईट व सोलर वाटर हिटिंग बसविणे या कामामध्ये अनियमितता आढळून आल्या आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त प्रमाणे सोलर लाईट व सोलर वाटर हिटिंग खरेदी करण्या पूर्वी प्राथमिक आरोग्य केंद्र यांना आवश्यक असलेल्या सोलर लाईट संख्या व सोलर वाटर हिटिंग बाबत आहवाल / मागणी पत्र संचिकेत उपलब्ध नाही.

2) सदरचे खरेदी केलेले सोलर लाईट व सोलर वाटर हिटिंग च्या किंमती ह्या दर्जाच्या अनुषंगाने खुल्या बाजारातील किंमती पेक्षा जास्त असणार नाही याची खात्री करून पुरवठा आदेश दिल्याचे संचीकेवरून दिसून आले नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83(3) सदर चे साहित्य खरेदी पूर्वी व नियम 79 प्रमाणे सदर चे साहित्य खरेदी नंतर सक्षम अधिकारी यांचा तपासणी आहवाल संचिकेत आढळून आला नाही.

4) सदरचे सोलर लाईट व वाटर हिटिंग बसविल्या नंतर ते व्यवस्थित काम करीत आसल्याबाबत संबधित प्राथमिक आरोग्य केंद्राचे/संस्थेचे प्रमाणपत्र/उपयोगिता प्रमाणपत्र संचिकेत उपलब्ध झाले नाही.

**3.598 जिल्हा परिषद उपकरातून पिसाळलेला कुत्रा चावल्यानंतर / सर्पदंश औषधी खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, हिंगोलीने सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात जिल्हा परिषद उपकरातून पिसाळलेला कुत्रा चावल्यानंतर/सर्पदंश औषधी यावर रूपये 7,98,000/- खर्च नोंदविला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेड.पी.ए.-2012/प्र.क्र. 6801/वित्त-9, दिनांक 19/03/2012 मधील टिप 1 नुसार जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद हिंगोली यांनी दरास मान्यता दिलेली माहिती विषय समिती व स्थायी समितीच्या पुढील बैठकित सादर केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, वैद्यकीय व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक डी.पी.आर.1080/1515/ सीआर-230/88/एमईडी-4 (ब), दिनांक 31/08/1990 मधील परिच्छेद क्रमांक 32 नुसार बिलापोटी अदा करावयाच्या एकुण रक्कमेच्या 80 टक्के रक्कम औषधी प्राप्त झाल्यावर व 20 टक्के रक्कम तपासणी झाल्यावर अदा करावयाची असतांना गुणात्मक तपासणी न करता 100 टक्के रक्कम एकदाच प्रदान करण्यात आली आहे.

3) महाराष्ट्र शासन, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक एच.पी.बी.पी.-1089/ 160/एम.डी.,दिनांक 20/04/1990 मधील उपपरिच्छेद क्रमांक 8 नुसार वित्तीय वर्ष सुरु झाल्यानंतर एका महिन्यात औषधाची मागणी करणे आवश्यक असतांना आरोग्य विभागाने मागणी माहे जानेवारी 2015 मध्ये केली असल्याने प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राना नियमित औषधाचा पुरवठा झालेला नाही.

4) संचालक, आरोग्य सेवा मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक सं.आ.से./औ.स./कढा.-12,दिनांक 17/12/1988 अन्वये उपलब्ध अनुदानाप्रमाणे औषधी खरेदी केल्यानंतर औषधाचे वाटप सर्व केंद्राना सारख्याप्रमाणात न करता रुग्णाच्या सरासरी उपस्थितीनुसार व प्राथमिक आरोग्य केंद्राच्य वर्गवारीनुसार करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही नाही.

**3.599 जिल्हा परिषद उपकरातून साथरोग निवारणार्थ प्रपत्र छपाई करणेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** आरोग्य विभाग, जिल्हा परिषद हिंगोलीने सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात जिल्हा परिषद उपकरातून रूपये 49,962/- साथरोग निवारणार्थ खर्च केलेला आहे. सदरबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-1088/(2512)/ उद्योग-6, दिनांक 02/01/1992 आणि महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक - भांखस/1093/82635/उद्योग-6, दिनांक 16/07/1993 नुसार रक्कम रुपये 1,000/- वरील खरेदीसाठी नोंदणीकृत विक्रेत्यांकडून दरपत्रके मागवून, सदरील दरपत्रकानुसार कमी दराचे साहित्य खरेदी करणे आवश्यक असुन सदरील दरपत्रकास जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावाव्दारे मंजुरी घेऊन कमी दराचे साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस/1094/(2679)/ उद्योग-6,दिनांक 30/03/1994 नुसार दोन लिफाफा पध्दतीव्दारे निविदा/दरपत्रके मागवुन खरेदी करणे अनिवार्य करण्यात आले असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 96 नुसार साठा नोंदवहीत प्रत्यक्ष साहित्य प्राप्त करुन घेतलेबाबत खात्री करणे व तसे प्रमाणपत्र नोंदविणे याबाबत कार्यवाही नाही.

4) महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, 1965 चे नियम 72 च्या अनुषंगाने परिशिष्ट 6 मधील तरतुदीचे पालन केलेले नाही.

5) आरोग्य विभाग, जिल्हा परिषद हिंगोलीने दिनांक 17/07/2014 रोजी नोटीस बोर्डावर नोटीस लाऊन हातोहात दिनांक 17/07/2014 ते 19/07/2014 या कालावधीत स्थानिकरित्या दरपत्रके मागवुन खरेदी केल्याने जिल्हा परिषदेस स्पर्धात्मकरित्या तुलनात्मक दराचा फायदा होऊ शकला नाही.

6) प्रमाणपत्रे वाटप केल्यानंतर काही ठिकाणी प्रमाणपत्रे घेणाऱ्यांची पोंच दिसुन आली नाही.

**3.600 अतिसंवेदनशील आदीवासी भागात विशेष आरोग्य सेवा पुरविणेअंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रासाठी औषधी व साधन सामुग्री खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** आरोग्य विभाग, जिल्हा परिषद हिंगोलीने सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात अतिसंवेदनशील आदिवासी भागात विशेष आरोग्य सेवा पुरविणेअंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांसाठी औषधी व साधनसामुग्री यावर रूपये 13,46,000/- खर्च नोंदविला असुन सदरबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक - झेड.पी.ए.-2012/ प्र.क्र. 6801/ वित्त-9, दिनांक 19/03/2012 मधील टिप 1 नुसार जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद हिंगोली यांनी दरास मान्यता दिलेली माहिती विषय समिती व स्थायी समितीच्या पुढील बैठकीत सादर केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, वैद्यकीय व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक डी.पी.आर.1080/1515/ सीआर-230/88/एमईडी-4 (ब),दिनांक 31/08/1990 मधील परिच्छेद क्रमांक 32 नुसार बिलापोटी अदा करावयाच्या एकुण रक्कमेच्या 80 टक्के रक्कम औषधे प्राप्त झाल्यावर व 20 टक्के रक्कम तपासणी झाल्यावर अदा करावयाची असतांना गुणात्मक तपासणी न करता 100 टक्के रक्कम एकदाच प्रदान करण्यात आली आहे.

3) महाराष्ट्र शासन, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक एच.पी.बी.पी.-1089/ 160/एम.डी.,दिनांक 20/04/1990 मधील उपपरिच्छेद क्रमांक 8 नुसार वित्तीय वर्ष सुरु झाल्यानंतर एका महिन्यात औषधाची मागणी करणे आवश्यक असतांना आरोग्य विभागाने मागणी माहे जानेवारी 2015 मध्ये केली असल्याने प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राना नियमित औषधांचा पुरवठा झालेला नाही.

4) संचालक, आरोग्य सेवा मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक सं.आ.से./औ.स./कढा-12,दिनांक 17/12/1988 अन्वये उपलब्ध अनुदानाप्रमाणे औषधी खरेदी केल्यानंतर औषधाचे वाटप सर्व केंद्राना सारख्या प्रमाणात न करता रुग्णाच्या सरासरी उपस्थितीनुसार व प्राथमिक आरोग्य केंद्राच्य वर्गवारीनुसार करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही नाही.

**3.601 आरोग्य उपकेंद्राकरिता खरेदी केलेल्या औषधी व साहित्य खरेदीतील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** सन 2014-2015 या कालावधीचे आरोग्य विभाग, जिल्हा परिषद नांदेडचे लेखापरिक्षणात रूपये 71,68,745/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) औषधी खरेदी करतांना संचालक यांचे पत्र क्रमांक स.आ.से./खरेदी कक्ष/औषधी व साधनसामग्री खरेदीदर/2012,दिनांक 11/12/2013 या पत्राचे अनुषंगाने सुचनांचे पालन केले नाही.

2) उपरोक्त औषधी खरेदीस तांत्रिक मान्यता प्राप्त होण्यासाठी प्रस्ताव सादर करतांना प्रस्तावित खरेदी कोणत्या वर्षाचे अनुदानातून करण्यात आली याबाबत वर्ष नमूद नाही.

3) उपलब्ध संचिकेत प्राथमिक आरोग्य केंद्रानुसार मागणी केलेले औषधी व साहित्य यांचे मागणीपत्र संचिकेत नाही.

**3.602 वैदयकिय यंत्रसामग्री व इतर साहित्य खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** सन 2014-2015 या कालावधीचे आरोग्य विभाग, जिल्हा परिषद नांदेडचे लेखापरिक्षणात रूपये 56,72,208/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) साहित्य वाटप करतांना आरोग्य केंद्रामधील जूने साहित्य निकामी बाबत प्रमाणपत्र नाहीत.

2) प्राथमिक आरोग्य केंद्राकडून साहित्य प्राप्तीच्या पोचपावत्या घेतल्या नाहीत.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती 1968 नियम 21 प्रमाणे पुरवठादारांना धनादेशाव्दारे रक्कम प्राप्ती झाल्याबाबतची पुरवठादाराची पोच पावती घेतली नाही.

**3.603 टि. एस. पी. योजनेअंतर्गत खरेदी केलेल्या औषधीबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** सन 2014-2015 या कालावधीचे आरोग्य विभाग, जिल्हा परिषद नांदेडचे लेखापरिक्षणात रूपये 10,66,320/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच तालूका अधिकारी यांची मागणी दिसून आली नाही.

2) रक्कम प्रदान करतांना 80 टक्के प्रदान औषधी साहित्य प्राप्ती नंतर 90 दिवसाच्या आत व उर्वरित क्वालिटी कंट्रोल अहवाल प्राप्त झाल्यानंतर 120 दिवसाच्या आत करणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही केलेली नाही.

3) प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्याकडून औषध प्राप्तीच्या पोचपावत्या घेतल्या नाहीत.

4) औषधी वाटप सर्व केंद्राना रूग्णाच्या सरासरी उपस्थिती नुसार व गरजेप्रमाणे करणे आवश्यक आहे. परंतू त्या प्रमाणे कार्यवाही न करता औषध वाटप केले आहे.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 29 नुसार पुरवठादाराची धनादेशाव्दारे रक्कम प्राप्त बाबतची पोचपावती संचिकेत नाही.

**3.604 जिल्हा वार्षिक योजनांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्राना औषधी / साधन सामुग्री खरेदीतील नियमबाहयतेबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** आरोग्य विभाग, जिल्हा परिषद लातूर सन 2014-2015 मध्ये रक्कम रुपये 20,80,578/- औषधी साहित्य खरेदी पोटी रक्कम प्रदान केल्याचे दिसून आले, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपलब्ध अनुदानाप्रमाणे औषधी खरेदी केल्यानंतर औषधीचे वाटप प्राथमिक आरोग्य केंद्र (आयुर्वेदिक) यांना सारख्या प्रमाणात न करता रुग्णांच्या सरासरी उपस्थितीनुसार व प्राथमीक आरोग्य केद्रांच्या वर्गवारीनुसार करणे आवश्यक आहे. परंतु त्याच प्रमाणे कार्यवाही न करता मोघम स्वरुपात औषधाचे वाटप केले आहे. त्यामुळे विहीत मर्यादेपेक्षा जास्त औषधाचा पुरवठा प्राथमिक आरोग्य केद्रांना झाला नसल्याबाबत अभिलेख्यावरुन पुर्तता दर्शवावी.

2) उपरोक्त प्रदानाच्या अनुषंगाने अनुक्रमांक 1 ते 6 बाबीची संचिका तपासले असता दरकराराप्रमाणे देयकापोटी अदा करावयाच्या रक्कमेपैकी 80 टक्के रक्कम साहित्य प्राप्त झाल्यानंतर व उर्वरीत 20 टक्के रक्कमेची अदाई शासकीय गुणवता चाचणी अहवाल (प्रमाणपत्र) प्राप्त झाल्यानंतर करणे आवश्यक परंतु सदरील खरेदी प्रकरणात गुणवता चाचणी अहवाल प्राप्त होण्यापुर्वीच पुर्ण 100 टक्के रक्कम अदाई करुन नियमबाहय प्रदान केलेले आहे तसेच शासकीय गुणवता अहवाल प्राप्त न करताच प्राथमिक आरोग्य केद्राना औषधाचे वाटप केलेले आहे. सदर नियमबाहयतेबाबत स्पष्टीकरण करुन पुर्तता दर्शवावी.

3) आरोग्य विभागांतर्गत एकुण 46 प्राथमिक आरोग्य केंद्र व 252 उपकेंद्र कार्यरत असुन त्यांच्याकडुन ग्रामीण भागातील रुग्णांना आरोग्य सेवा पुरविणेसाठी नियमीतपणे दरमहा औषधाची मागणी होत असते त्यांना आवश्यक ती औषधी नियमीतपणे पुरवठा करणे क्रमप्राप्त ठरते. परंतु सदरील संचिकेची तपासणी केली असता माहे ऑगस्ट 2014 मध्ये कार्यालयीन कार्यवाही होऊन माहे डिसेबर 2014 फेबुवारी व मार्च 2015 मध्ये खरेदी प्रक्रीया करुन मोठया प्रमाणात औषधी खरेदी केलेली आहे.

4) औषधी साठा नोंदवही नमुना नंबर 33 ची तपासणी केली, असता दिनांक 31/03/2015 रोजी औषधी साठा शिल्लक असल्याचे आढळुन आले.

5) प्रमाणक क्रमांक 640,दिनांक 31/03/2015 रुपये 8,62,470/- अन्वये मे.विशाल ॲन्टासीड सिरीप औषधी खरेदी जिल्हा अरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातुर. यांचे पुरवठा आदेश क्रमांक 148, दिनांक 18/03/2015 तसेच इनव्हाईस क्रमांक व्ही.पी/194, दिनांक 18/03/2015 व प्रत्यक्ष माल प्राप्त दिनांक 24/03/2015 या सर्व प्रक्रिया एकाच आठवडयात कशा प्रकारे पार पाडल्या याबाबत संबंधिताचे समर्थनीय खुलासा सादर करुन लेखापरिक्षणाची साधार लेख्याधारे सत्यता दर्शवावी. सदरील नियमबाहयतेबाबत संबंधिताचे समर्पक स्पष्टीकरण करुन सक्षम प्रधिका-याची मान्यता दर्शवावी.

6) आरोग्य विभागाने प्राथमिक आरोग्य केंद्राकडुन औषधाची मागणी मोघम स्वरुपाची प्राप्त करुन प्रत्यक्ष खरेदी मागणी पेक्षा कमी केलेली आहे तफावती बाबत पुर्तता दर्शवावी.

7) सदरील औषधी खरेदी प्रक्रीया हि निविदा प्रक्रियाद्वारे शासन दरकरारावर केलेली आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांचे पुरवठा आदेश पत्र क्रमांक 479, दिनांक 19/08/2014 अन्वये, मे. हेल्थ सेक्युर्स प्रा. लि. तळोजा जिल्हा रायगड यांना 11210 एवढया नगाचा गॅमाबेन्झीन हायड्रोक्लोराईड क्रिम (100 एम. एल.) पुरवठा करणेबाबत आदेश देण्यात आलेला असुन, सदरील पुरवठाधारकाने 25/03/2015 पर्यत औषधाचा पुरवठा

केलेला नाही. त्याअनुषंगाने आरोग्य विभागाने पत्र क्रमांक-1) दिनांक 21/09/2014, 2) पत्र क्रमांक 639, दिनांक 08/01/2014 व पत्र क्रमांक 83, दिनांक 03/02/2015 अन्वये, स्मरणपत्र पाठवुनही याची दखल संबंधीत पुरवठादाराने घेतलेली नाही. सहसंचालक यांचे पत्र क्रमांक संआसे/ जिल्हास्तर/तांत्रिकमान्यता/टे-6/कक्ष-7अ/14,दिनांक 23/07/2014 / 30 के. नुसार तांत्रिक मान्यता प्रदान करुन औषधी खरेदीस मंजूरी दिलेली असतांना तांत्रिक आदेशातील अनुक्रमांक 10 नुसार आरोग्य विभागाने संचालनालयास अवगत केलेले आहे. तथापि संबंधीत पुरवठाधारक मे. हेल्थ सेक्युर्स प्रा. लि. तळोजा जिल्हा रायगड यांनी विहित मुदतीत औषधी पुरवठा न केले बाबत संचालक स्तरावर योग्य ती दंडात्मक कार्यवाही करुन पुरवठा धारकाचे नाव काळया यादीत समाविष्ट करुन संबंधीतावर उचित कार्यवाही करणे आवश्यक होते. तशी कार्यवाही संचालक स्तरावर करण्याचे कळविले असुन,तसेच सहसंचालक, आरोग्य सेवा मुंबई, यांनी त्यांचे स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली याचा समर्पक समर्थनीय खुलासा होणे आवश्यक आहे.

8) टिपणी पान क्रमांक 17, दिनांक 26/03/2015 नुसार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती 1968 चे नियम 89 नुसार नवीन खरेदीस मंजूरी देवुन जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यानी पुरवठा आदेश क्रमांक 163, दिनांक 26/03/2015 अन्वये, मे. विशाल एटरप्रायजेस कोल्हापूर, यांचेकडुन विलंबाने वर्षा अखेर (31/03/2015) नियमबाहयपणे औषधी खरेदी करण्यात आलेली आहे.

9) साठा नोदवही नमुना नंबर 33 ची पडताळणी केली असता पान क्रमांक 67 वर 7937 नग वर्षा अखेर शिल्लक असल्याचे सकृत दर्शनी आढळुन आले, सदरील योजनेची औषधी वाटप त्याच सन 2014-15 या वित्तीय वर्षात न होता पुढील आर्थिक वर्षात झाल्याचे स्पष्ट होते.

10) प्रमाणक क्रमांक 649, दिनांक 31/03/2015 रक्कम रुपये 61,500/- मे. हेल्थ सेक्युर्स इंडिया प्रा. लि. मुंबई, यांचेकडुन उपप्रमाण क्रमांक 1068, दिनांक 12/01/2015 अन्वये, ॲन्टीमेंट क्लोट्रायमॅझोल औषधी खरेदी करुन संबंधीतास रक्कमेचे प्रदान रुपये 54,859/- करण्यात करण्यात आलेले आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी पुरवठा आदेश क्रमांक 499, दिनांक 19/08/2014 रोजीचा दिलेला असुन संबंधीत पुरवठाधारकाने उशिराने औषधी पुरवठा केलेला आहे. विलंबाने पुरवठा केला असलेने दंडनिय कार्यवाही होणे आवश्यक आहे.